POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२८९ ● मुंबई, शुक्रवार, २२ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

६ पोलीस आणि ४ आंदोलक जखमी

वांद्रे पूर्वेकडील बेहरामपाडा परिसरात रेल्वेच्या जागेवरील अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईदरम्यान जमावाकडून दगडफेक करण्यात आल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. या घटनेत ४ पोलीस कर्मचारी आणि ६ आंदोलक जखमी झाले आहेत. सर्व जखमींवर भाभा रुग्णालय आणि व्ही. एन. देसाई रुग्णालयात उपचार करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, पश्चिम रेल्वेकडून वांद्रे टर्मिनसजवळील गरीब नगर, बेहरामपाडा परिसरात रेल्वेच्या जागेवरील अतिक्रमण हटवण्याची कारवाई सुरू होती. यावेळी काही स्थानिक नागरिकांनी विरोध दर्शवत आंदोलन केले. परिस्थिती तणावपूर्ण झाल्यानंतर जमावाकडून पोलिसांवर आणि कारवाई पथकावर दगडफेक करण्यात आली. या दगडफेकीत पोलीस कर्मचारी विपुल विजयकुमार कदम (३९), मनीष भीमराव बच्छाव (४४), जितेंद्र कुमार सतेंदर (४५), नवनाथ अण्णा मुदगुळ (४५), ओंकार दीपक कोळी (३९) आणि चंद्रकांत ढाम्बळे (४५) जखमी झाले. यापैकी जितेंद्र कुमार सतेंदर यांना व्ही. एन. देसाई रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. इतर पोलिसांनी उपचारानंतर रुग्णालयातून डिस्चार्ज घेतला. तसेच आंदोलकांपैकी वैभव गीते (२५), फिजान अनवाज खान (२२), ए. रशीद खान (१७) आणि अन्सार अली बेग (४९) हे जखमी झाले. अन्सार अली बेग यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. उर्वरित जखमींनी उपचारानंतर रुग्णालय सोडले. या घटनेनंतर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

वांद्रेतील दगडफेक प्रकरण तापलं!

गरिब नगरमधून १६ जणांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईतील वांद्रे परिसरातील गरिब नगर येथे झालेल्या दगडफेक प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत १६ जणांना अटक केली आहे. परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन गटांमध्ये झालेल्या वादानंतर अचानक दगडफेक सुरू झाली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. काही वाहनांचे नुकसान झाल्याचीही माहिती समोर येत आहे. घटनेनंतर वांद्रे पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीद्वारे आरोपींची ओळख पटवली. त्यानंतर विशेष पथकाने कारवाई करत १६ जणांना ताब्यात घेतले. सर्व आरोपींवर दंगल, सरकारी कामात अडथळा आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान यांसारख्या गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात



आले आहेत.

सध्या गरिब नगर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

मुंबईकरांच्या खिशाला चटका!

वडापाव 'इतक्या' रुपयांनी महागला



■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबईच्या खाद्यसंस्कृतीची ओळख आणि इथल्या रोजच्या जगण्याचा अविभाज्य भाग मानल्या जाणाऱ्या लोकप्रिय 'वडापाव'च्या किंमतीत अनेक प्रसिद्ध स्टॉल्सवर वाढ झाली आहे. आता ग्राहकांना अनेक ठिकाणी वडापावसाठी 2 ते 5 रुपये जास्त मोजावे लागत आहेत. 'आराम वडापाव' आणि 'अशोक वडापाव' यांसारख्या प्रसिद्ध ठिकाणांवर ही दरवाढ झाल्याचे समोर आले आहे, जिथे नव्या दरांनंतरही नियमित ग्राहकांच्या रांगा नेहमीप्रमाणेच पाहायला मिळत आहेत.

'यामुळे' आर्थिक बोजा वाढला

इंधनाच्या दरात झालेल्या वाढीचा थेट फटका दैनंदिन कामकाजासाठी व्यावसायिक गॅसवर अवलंबून असलेल्या छोट्या खाद्य व्यवसायांना बसला आहे. एलपीजी व्यतिरिक्त, खाद्यतेल आणि बेसन (हरभरा डाळीचे पीठ) या वडापावसाठी लागणाऱ्या मूलभूत साहित्याच्या किंमतीही वाढल्या आहेत, ज्यामुळे स्टॉल मालकांवरील आर्थिक बोजा अधिकच वाढला आहे. अनेक वडापाव स्टॉल्सवर हा पदार्थ 1 ते 2 रुपयांनी महागला आहे, तर शहरातील काही अत्यंत प्रसिद्ध आउटलेट्सनी किंमती थेट 5 रुपयांपर्यंत वाढवल्या आहेत. नरिमन पॉईंट येथील एका स्टॉल मालकाने सांगितले की, मुंबईकरांच्या या आवडत्या खाद्यपदार्थाची निर्मिती खर्च सांभाळणे आता कठीण झाले आहे.

खर्च वाढल्यामुळे किंमत वाढली

"तेल, बेसन आणि गॅसचे भाव वाढले आहेत. आम्हाला पूर्वी 1000 रुपयांना मिळणारा व्यावसायिक गॅस सिलिंडर आता 3000 रुपयांना मिळत आहे. एवढ्या खर्चात ताळमेळ बसवणे खूप कठीण जात आहे. म्हणूनच आम्ही इथे वडापावची किंमत सुमारे 1 ते 2 रुपयांनी वाढवली आहे," असे एका विक्रेत्याने सांगितले. तर दुसरीकडे, 'अशोक वडापाव' येथे झालेल्या दरवाढीमुळे त्यांच्या निष्ठावंत ग्राहकांवर काहीही फरक पडलेला नाही. व्यावसायिक गॅसच्या तुटवड्यामुळे काही काळ तात्पुरता बंद असलेला हा स्टॉल पुन्हा सुरू झाला असून, तिथे नेहमीसारखीच गर्दी उसळत आहे.

देशभरात वाढणारी महागाई पाहता ही दरवाढ समजण्यासारखी आहे, असे अनेक ग्राहकांनी सांगितले. ''raw material'' (कच्च्या मालाचा) खर्च वाढल्यामुळे ही किंमत वाढ रास्त आहे. आणि ही वाढ सर्वत्र झाली आहे. ती केवळ इथेच नाही, तर संपूर्ण भारतात झाली आहे," असे एका वडापाव प्रेमीने या चवदार पदाथार्चा आस्वाद घेताना आणि दरवाढीची कोणतीही झळ न जाणवू देता सांगितले.

'30 वर्षांपासून वडापाव खातोय'

नरिमन पॉईंट येथील आणखी एका ग्राहकाने गेल्या काही दशकांत या खाद्यपदार्थाच्या किंमतीत कसा बदल झाला, याच्या आठवणींना उजाळा दिला. "पूर्वी याची किंमत 8 ते 10 रुपये असायची. सध्या वडापाव 25 रुपयांना मिळतोय. मी मुंबईत असतो तेव्हा कधीकधी हा खातो," एका ग्राहकाने सांगितले. तर दुसऱ्या एका ग्राहकाने म्हटले, "ही आमची सवय किंवा गरज बनली आहे. आम्ही वडापाव खातोच. आम्ही गेली जवळपास 30 वर्षे हा खात आलो आहोत. गॅसचे सध्याचे दर वाढले आहेत. जर हे दर दिवसागणिक असेच वाढत राहिले, तर आम्हाला वडापाव खाणे बंद करावे लागेल. हे अजिबात चांगले वाटत नाही, पण कधीकधी नाईलाजास्तव खावे लागते."

ही दरवाढ व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या वाढत्या किंमतींचा व्यापक परिणाम दर्शवते, कारण छोटे उपाहारगृहे (ईटरीज) आणि रस्त्यावरील विक्रेते व्यवसायाचा वाढलेला खर्च ग्राहकांकडून वसूल करत आहेत. घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर स्थिर असले, तरी वडापाव स्टॉल्ससारख्या व्यवसायांवर याचा मोठा ताण येत आहे, ज्यामुळे मुंबईचा हा सर्वात स्वस्त आणि परवडणारा स्नॅक आता खिशाला थोडा जड वाटू लागला आहे.

अंबाजोगाईचे दोघं लातूरमध्ये नीटची तयारी करायचे... आता सीबीआयकडून चौकशी

■बीड। प्रतिनिधी,

देशभरात प्रचंड खळबळ उडवून देणाऱ्या ठएएळ (वैद्यकीय पात्रता परीक्षा) पेपर फुटी प्रकरणाचे धागेदोरे आता बीड शहरासह अंबाजोगाईत पोहोचले आहेत. या हायप्रोफाईल प्रकरणाचा तपास करणाऱ्या केंद्रीय अन्वेषण विभागाने आज अंबाजोगाईत धडक कारवाई केली. सीबीआयच्या पथकाने शहरातील दोन संशयित विद्यार्थ्यांची तब्बल दोन तास कसून चौकशी केल्याने संपूर्ण जिल्ह्यात आणि शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

दोन विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन एका अज्ञात ठिकाणी चौकशी

मिळालेल्या माहितीनुसार, सीबीआयचे विशेष तपास पथक आज, 21 मे रोजी सकाळीच अत्यंत गुप्तपणे अंबाजोगाई शहरात दाखल झाले. स्थानिक पोलिसांनाही फारशी भनक लागू न देता सीबीआयने थेट संशयित विद्यार्थ्यांचा शोध घेत कारवाई सुरू केली. या पथकाने दोन विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन एका अज्ञात ठिकाणी त्यांची दोन तास कसून चौकशी केली.

विद्यार्थ्यांचे मोबाईल फोन आणि मेमरी कार्ड घेतले ताब्यात

चौकशी दरम्यान तपास यंत्रणेने अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलत दोन्ही विद्यार्थ्यांचे मोबाईल फोन आणि मेमरी कार्ड आपल्या ताब्यात घेतले आहेत. हे दोन्ही विद्यार्थी लातूर येथे राहून वैद्यकीय परीक्षेचे तयारी करत



होते, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. लातूर हे महाराष्ट्रातील कोचिंग क्लासेसचे मुख्य केंद्र असल्याने, या प्रकरणाचे धागेदोरे आता लातूरमधील मोठ्या रॅकेटशी जोडले गेले आहेत का? यादृष्टीने तपास सुरू झाला आहे. या दोन्ही संशयित विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वीच गैरमार्गाने किंवा आर्थिक देवाणघेवाण करून नीटचा पेपर मिळवला असल्याचा दाट संशय सीबीआयला आहे. ताब्यात घेतलेल्या मोबाईल आणि मेमरी कार्डमधील डिजिटल डेटा, चॅट्स आणि कॉल्सच्या माध्यमातून या संशयाची शहानिशा केली जात आहे. बीड आणि लातूर जिल्हा आधीच नीट प्रकरणातील काही संशयितांच्या अटकेमुळे चर्चेत आहे. आता थेट अंबाजोगाईत सीबीआयने पाऊल ठेवल्यामुळे या रॅकेटची पाळेमुळे मराठवाड्यात किती खोलवर रुजली आहेत, हे स्पष्ट होत आहे. आजच्या या मॅरेथॉन चौकशीतून आणि जप्त केलेल्या मोबाईलच्या फॉरेन्सिक डेटावरून आता नेमका कोणता मोठा खुलासा समोर येतो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

डॉक्टरांनी लेकासाठी मोटेगावकरांकडून पेपर विकत घेतला उइकने आवळल्या मुसक्या

नीट पेपर लीक प्रकरणात स्वतःच्या मुलासाठी पेपर विकत घेतल्याच्या आरोपावरून बालरोग तज्ज्ञ यांना सीबीआयने काल रात्री ताब्यात घेतले. लातूरच्या औसा रोडजवळील सिद्धिविनायक रुग्णालयातील डॉक्टरांची मनोज शिरूरे अशी ओळख समोर आली. बुधवारी रात्री सीबीआयने शिरूरे यांच्या सिद्धिविनायक रुग्णालयातच रात्री रेड टाकल्याची माहिती समोर आली.

डॉक्टर शिरूरे यांच्यावर उइकची धाड

याचदरम्यान डॉक्टर शिरूरे यांची कसून तीन तास चौकशी करण्यात आली होती. नंतर त्यांना नोटीस देऊन सोडवले. मात्र काल रात्री उशिराने त्यांना पुणे येथून सीबीआयने ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली. त्यांना पुढील चौकशीसाठी दिल्ली येथे रवाना करण्यात आले अशी सूत्रांनी माहिती दिली होती. त्यांनी आपल्या स्वतःच्या मुलासाठी मोटेगावकरांकडून नीटचा पेपर विकत घेतल्याचा आरोप केला आहे.

लातूरमधून आतापर्यंत तिघांना अटक

मात्र, पुढे तोच पेपर त्यांनी इतर कोणत्या विद्यार्थ्यांना दिला याचा देखील तपास सीबीआय करताना दिसते. नीट पेपर लीक प्रकरणात लातूर येथून ही तिसरी अटक करण्यात आली. याआधी पी व्ही कुलकर्णी आणि शिवराज मोटेगावकरनंतर डॉक्टर मनोज शिरूरे यांना उइकने अटक केली.

नीट पेपर लीक प्रकरण केवळ राज्यच नाही,तर आता देश हादरून गेला आहे. राज्यभरात मोटेगावकारांच्या शिक्षणामागाचा काळाबाजार समोर आला आहे. सीबीआयच्या या एकूण तपासातून याचे धागेदोरे कुठपर्यंत पोहोचले याचा तपास केला जाईल.

विवाहित महिलेचा तब्बल सातवेळा गर्भपात

नाशिकमधील ३३ वर्षीय तरुणीचा छळ, पतीसह सासू-सासऱ्यांना दणका

■नाशिक। प्रतिनिधी,

पतीसह सासू-सासऱ्यांनी सातवेळा सक्तीने गर्भपात घडवून आणल्याचा आणि विवाहबाह्य संबंधांतून विवाहित महिलेचा मानसिक व शारीरिक छळ केल्याचा प्रकार उघड झाला. म्हसरूळ पोलिसांत संशयित पती, सासू-सासऱ्यांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला.

३३ वर्षीय पीडितेच्या फियार्दीनुसार, २०११मध्ये पंचवटीतील विवाह मंडळात तिचा आंतरजातीय प्रेमविवाह झाला होता. कौटुंबिक विरोध असल्याने हे दाम्पत्य परजिल्ह्यात वास्तव्यास होते. पीडिता पहिल्यांदा गर्भवती असताना नाशिकमध्ये माहेरी मुक्कामी होती. त्यावेळी पती विक्रम (नाव बदलले) व सासू-सासऱ्यांनी तिला मानसिक त्रास दिला. डिसेंबर २०१५ मध्ये दोन्ही कुटुंबांत सामंजस्याने एकत्रित राहण्याचा निर्णय झाला. त्यानंतर पीडितेने एक मुलगा व मुलीला जन्म दिला. संशयितांनी तिला नाशिकमध्ये बोलावून घेतले. तिला मारहाण व मुलांना जिवे मारण्याची धमकी दिली. मखमलाबाद येथे घर घेण्यासाठी पीडितेचे सर्व पैसे, दागिने घेऊन विम्यावर कर्ज काढले. २०२४ मध्ये संशयिताचे विवाहबाह्य संबंध असल्याचे निदर्शनास आले.

दरम्यान, पीडितेला पतीसमवेत राहू न देता सासू-सासऱ्यांसोबत राहण्याची सक्तीही करण्यात आली होती. अखेर या सर्व प्रकाराला कंटाळून पीडितेने पोलिसांत धाव घेतली.

गर्भपात, विनयभंगप्रकरणीपतीसह चार संशयितांवर गुन्हा

नाशिकमध्ये आणखी एक धक्कादायक घटना उघड झाली आहे. विवाहित महिला दोन महिन्यांची गर्भवती असताना तिच्या पोटावर लाथा मारून तिचा गर्भपात करण्यासह तिच्या पतीने 'हलाला' विधीच्या नावाखाली मित्रांना घरात बोलावून पीडितेचा विनयभंग केल्याचा प्रकार उघड झाला. आयेशानगर येथील २२ वर्षीय विवाहितेच्या फियार्दीवरून मुंबई नाका पोलिसांत संशयित पती अशरफ मलिक, इम्रान चौधरी, आसिक शेख व समीर खान यांच्यावर गुन्हा नोंद आहे.

पीडित महिलेचे लग्न संशयित अशरफ मलिक याच्याशी झाले होते. संशयिताने त्याचे पहिले लग्न झाल्याची बाब लपवून ठेवली. काही दिवसांतच पीडितेचा मानसिक व शारीरिक छळ सुरू केला. संशयिताने दोन वेळा पीडितेला जिवे मारण्याचाही प्रयत्न केला. पती व शालक समीर सोहेल खान यांनी संगनमताने तिच्या पोटावर लाथा मारून गर्भपात केला. पतीच्या सांगण्यावरून संशयित चौधरी व शेख यांनी 'हलाला' विधीच्या नावाखाली बोलावून विनयभंग केल्याचा आरोप आहे.





बालाजी नगर गोळीबार प्रकरणात आंदेकर टोळीतील चौघांना उचललं

12 जणांविरोधात गुन्हा दाखल

■पुणे। प्रतिनिधी,

पुणे शहरातील गुन्हेगारी आणि टोळी संघर्ष पुन्हा एकदा अत्यंत भीषण रित्या समोर आला असून, माजी नगरसेवक वनराज आंदेकर हत्या प्रकरणानंतर सुरू असलेली वैराची मालिका अद्याप थांबलेली नाही. शहरातील बालाजीनगर परिसरात बुधवारी (दि.20) सकाळी भरदिवसा अक्षय ऊर्फ बाळा म्हस्के (वय 26) या रिक्षाचालकावर आंदेकर टोळीच्या नावाने गोळीबार आणि कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या थरारक प्रकारामुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलिसांनी निधेश विंचुरकर, वेदांत टेमगिरे, आवेज शेख, ऋषी आंबट, लाला उर्फ अमन आणि अन्य एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी जखमी रिक्षाचालक अक्षय मस्के यांच्या पत्नी करुणा मस्के यांनी सहकारनगर पोलीस ठाण्यात अधिकृत फिर्याद दिली आहे. या जीवघेण्या हल्ल्यामध्ये अक्षय ऊर्फ बाळा म्हस्के (वय २६, रा. आंबेगाव पठार) हा युवक गंभीररित्या जखमी झाला असून त्याच्यावर सध्या भारती रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याची प्रकृती सध्या अत्यंत चिंताजनक आहे. जखमी अक्षय म्हस्के याला एक लहान मुलगी असल्याचेही समोर आले आहे.



पुण्यात माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या हत्येनंतर शहरात सलग हिंसक घटना घडताना दिसत आहेत, ज्यामुळे नागरिक सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत आहेत. काही दिवसांपूर्वीच शहरात आयुष्य कोमकर याची निर्घृण हत्या करण्यात आली होती, आणि त्यानंतर एका आरोपीच्या रिक्षाचालक भावावरही जीवघेणा हल्ला झाला होता. बुधवारी झालेला हा ताजा हल्ला देखील त्याच जुन्या वैराच्या आणि टोळी युद्धाच्या साखळीतून झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, बुधवारी सकाळी सुमारे सव्वादहा वाजण्याच्या दरम्यान अक्षय म्हस्के हा बालाजीनगर येथील संविधान चौक परिसरात आला होता. तो तिथे थांबला असतानाच अचानक दुचाकीवरून आलेल्या चार हल्लेखोरांनी त्याच्यावर पाळत ठेवून थेट गोळीबार सुरू केला. हल्लेखोरांनी घटनास्थळी तब्बल तीन राऊंड फायरिंग केल्याची प्राथमिक माहिती असून, त्यातील एक गोळी अक्षयच्या शरीराला लागली. गोळीबार केल्यानंतरही नराधम हल्लेखोर तिथेच थांबले नाहीत, तर त्यांनी आपल्या जवळील धारदार कोयत्याने अक्षयवर सपासप वार करत त्याला रक्ताच्या थारोळ्यात पाडले आणि त्यानंतर ते घटनास्थळावरून वेगाने पसार झाले.

वनराज आंदेकर हत्या प्रकरणातील आरोपीच्या भावावर सूड उगवला

भरचौकात घडलेल्या या भयानक घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ आणि पळापळ निर्माण झाली होती. स्थानिक नागरिकांनी अत्यंत तत्परता दाखवत गंभीर जखमी झालेल्या अक्षयला तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल केले. या घटनेमुळे बालाजीनगर आणि आसपासच्या परिसरात काही काळासाठी प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, ज्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी घटनास्थळी आणि परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, जखमी अक्षय म्हस्के हा माजी नगरसेवक वनराज आंदेकर हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी आकाश म्हस्के याचा सख्खा भाऊ आहे. तसेच मध्य प्रदेशातून पुण्यात बेकायदेशीर पिस्तुले आणण्यात अक्षय म्हस्के याची महत्त्वाची भूमिका असल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यामुळेच या हल्ल्यामागे जुना टोळी संघर्ष, टोळीचे वर्चस्व आणि आंदेकर यांच्या हत्येचा सूड उगवण्याची भावना कारणीभूत असल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे.

नशेचं इंजेक्शन देऊन सामुहिक बलात्कार... नीटची तयारी करणाऱ्या विद्यार्थीनीसोबत भयंकर घडलं!

■मुंबई । प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातील महोबा जिल्ह्यात वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करणाऱ्या एका विद्यार्थिनीचे अपहरण करून तिच्यावर सामूहिक बलात्कार केल्याची अत्यंत खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. मध्य प्रदेशातील रहिवासी असलेली ही विद्यार्थिनी महोबा शहरात राहून नीट परीक्षेची तयारी करत होती. गेल्या 30 एप्रिल रोजी कोचिंग क्लासवरून घरी परतत असताना कारमधून आलेल्या काही गुंडांनी तिचे अपहरण केले होते. या घटनेनंतर तब्बल 16 दिवसांनी पोलिसांनी या विद्यार्थिनीचा शोध घेतला असून तिला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अर्धा डझन आरोपींच्या मदतीने कोंडून ठेवले : पीडित विद्यार्थिनीने पोलिसांना सांगितलेली आपबीती अत्यंत अंगावर काटा आणणारी आहे. पीडितेच्या म्हणण्यानुसार, तिच्याच गावातील मोहित श्रीवास याने अंकित श्रीवास आणि हल्लू राजपूत यांच्यासह सुमारे अर्धा डझन आरोपींच्या मदतीने तिला प्रयागराज येथे कोंडून ठेवले होते. या दरम्यान तिला दर दोन तासांनी नशा देणारे इंजेक्शन दिले जात होते आणि मोहितने तिच्यावर बलात्कार केला. या कृत्याला विरोध केला असता नराधमांनी तिला सिगरेटचे चटके दिले आणि चाकूने वार केले, तसेच तिच्या भावाचा फोटो दाखवून जीवे मारण्याची धमकी देत मोहितने तिच्याशी जबरदस्तीने लग्नही केले. आता ही पीडिता मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडे न्यायाची आणि दोषींना फाशी देण्याची मागणी करत आहे.

सामुहिक बलात्काराच्या घटनेनंतर काँग्रेस आक्रमक

या भीषण घटने समोर आल्यानंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून यावरून आता राजकारणही तापले आहे. काँग्रेस पक्षाने या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरले असून काँग्रेसचे प्रदेश सचिव ब्रजराज सिंह यांनी सांगितले की, उत्तर प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अजय राय यांच्या सूचनेनुसार पक्ष या घटनेवर बारीक लक्ष ठेवून आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अजय राय यांनी पीडितेशी फोनवर संवाद साधला असून ब्रजराज सिंह यांनी आरोपींवर तातडीने कडक कारवाई करण्याची आणि पीडितेवर चांगल्या उपचारांची मागणी केली आहे. तसेच काँग्रेसचे एक प्रांतीय शिष्टमंडळ लवकरच पीडितेची भेट घेण्यासाठी महोबा येथे पोहोचणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे.


या संपूर्ण प्रकरणाबाबत अप्पर पोलीस अधीक्षक वंदना सिंह यांनी माहिती दिली की, 1 मे 2026 रोजी एका महिलेने कोतवाली नगर महोबा येथे आपली 25 वर्षांची मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार देऊन काही नामजद आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. या तक्रारीच्या आधारे गुन्हा नोंदवून चार पथके तयार करण्यात आली होती आणि पथकांच्या प्रयत्नांमुळे 16 मे रोजी तरुणीला सुखरूप शोधून तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. आतापर्यंत तीन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी सुरू असून त्यांना लवकरच न्यायालयात हजर केले जाईल, तसेच उर्वरित आरोपींच्या अटकेसाठी एसओजी आणि सर्व्हिलन्सच्या मदतीने चार पथके काम करत असून लवकरच सर्व आरोपींना अटक केली जाईल.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

लोकसंख्येच्या वाढीसाठी पैसे!



भारत लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर आहे, तरीही आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी राज्यातील जनतेला 'हम दो हमारे दो' विसरून अधिक मुले जन्माला घालण्याचे आवाहन केले आहे. यासाठी त्यांनी 'तिसऱ्या अपत्यासाठी ३० सहस्र आणि चौथ्यासाठी ४० सहस्र रुपये लगेच देण्यात येतील', असे म्हटले आहे. यापूर्वी नायडू यांनी दुसऱ्या अपत्यासाठी २५ सहस्र रुपये देण्याचा प्रस्ताव मांडला होता, तसेच तिसऱ्या अपत्याला १८ वर्षांपर्यंत विनामूल्य शिक्षण देण्याचा विचारही धोरणाच्या प्रारूपात करण्यात आला होता. शाळेत जाणाऱ्या मुलांच्या पालकांना 'तल्ली की वंदनम्' योजनेअंतर्गत आधीच १५ सहस्र रुपये दिले जात आहेत, ज्यामध्ये वाढ करण्याचे संकेतही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. अचानक झालेल्या आताच्या घोषणेमुळे भारतीय चकीत झाले आहेत. एकीकडे भारताच्या लोकसंख्येवर नियंत्रण मिळवणे आवश्यक असतांना अशा प्रकारची विरोधाभासी घोषणा का करावी लागली आहे? हा प्रत्येकाच्या मनात प्रश्न उपस्थित होतो. ही घोषणा वर वर विसंगत वाटली, तरी त्यामागे दडलेले लोकसंख्याशास्त्रीय संकट आणि भविष्यातील हिंदूंच्या अस्तित्वाचे धोके अत्यंत भीषण आहेत. उत्तर भारतात लोकसंख्येचा स्फोट आहे, तर दक्षिण भारतात तरुण रक्ताचा दुष्काळ पडण्याची चिन्हे आहेत. हा प्रादेशिक असमतोल देशाच्या अखंडतेसाठी धोकादायक ठरू शकतो. जपान आणि युरोपातील देश आज मनुष्यबळासाठी तळमळत आहेत; तीच वेळ दक्षिण भारतातील हिंदूंवर येऊ नये, ही दूरदृष्टी नायडूंच्या निर्णयात दिसते, असे सांगितले जात आहे. दक्षिण भारतातील राज्यांमध्ये, विशेषतः आंध्रप्रदेश आणि तमिळनाडू यांमध्ये गेल्या ३ दशकांपासून 'कुटुंब नियोजना'चे ओझे प्रामुख्याने सुशिक्षित हिंदु समाजानेच उचलले. याचा परिणाम असा झाला की, या राज्यांच्या 'प्रजननाचे प्रमाण' २.१ या आवश्यक पातळीपेक्षाही खाली (१.७ ते १.९) घसरले आहे. हिंदूंनी 'हम दो हमारा एक' हे धोरण स्वीकारल्यामुळे तरुण हिंदूंची संख्या न्यून होत असून वृद्ध हिंदूंची संख्या वेगाने वाढत आहे. जर हीच स्थिती राहिली, तर पुढील २० वर्षांत या राज्यांत काम करणाऱ्या हिंदु तरुणांची कमतरता भासेल आणि 'वृद्धांचा समाज' अशी हिंदूंची ओळख होईल. हे टाळण्यासाठी नायडू प्रयत्न करत आहेत. वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार आंध्रप्रदेशात ८८.४६ टक्के हिंदु, ९.५६ टक्के मुसलमान आणि १.३४ टक्के ख्रिस्ती नोंदवले गेले होते; मात्र हे चित्र अत्यंत फसवे आहे. आंध्रमध्ये 'अधिकृत' ख्रिस्ती संख्या १.३४ टक्के दिसत असली, तरी वास्तवात ती १० ते १५ टक्क्यांच्या पुढे गेल्याचे अनेक सामाजिक अभ्यासक सांगतात. अनेक धर्मांतरित ख्रिस्ती केवळ आरक्षणाच्या लाभासाठी सरकारी कागदपत्रांवर स्वतःची 'हिंदु' अशीच नोंद ठेवतात. यामुळे हिंदूंची संख्या कागदावर मोठी दिसत असली, तरी आचरणाने आणि निष्ठेने हिंदु असलेला समाज घटत चालला आहे. त्याच वेळी मुसलमानांचे प्रजननाचे प्रमाण हिंदूंपेक्षा नेहमीच अधिक राहिले आहे. केरळम्सारख्या राज्यात तर हिंदूंची लोकसंख्या ५४.७ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. हीच लाट आता आंध्र आणि तेलंगाणा या राज्यांकडे सरकत आहे. जेव्हा एखाद्या विशिष्ट वर्गाची लोकसंख्या घटते, तेव्हा त्याचा परिणाम राजकीय स्थितीवरही होतो. भविष्यात लोकसभेच्या जागांची पुनर्रचना होणार आहे. ज्या राज्यांची लोकसंख्या न्यून होईल, त्यांच्या संसदेतील जागा न्यून होतील. याचा अर्थ दक्षिण भारताचा देशाच्या राजकारणातील प्रभाव न्यून होईल. त्यातही हिंदूंची संख्या अंतर्गतरित्या घटल्यामुळे हिंदूंच्या हिताचे रक्षण करणारे नेतृत्व निवडून येणे कठीण होईल. म्हणूनच कुटुंबांना तिसऱ्या अपत्यासाठी पैसे देऊन शासन त्यांना एकप्रकारे 'संख्यात्मक युद्धा'त उतरण्याचे आवाहन करत आहे. आंध्र आणि तमिळनाडू येथे ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कार्य मोठ्या प्रमाणावर चालते. आर्थिक प्रलोभने किंवा आरोग्याच्या सुविधा यांच्या नावाखाली होणाऱ्या धर्मांतरामुळे हिंदु समाज आतून पोखरला जात आहे. कागदावर 'हिंदु'; पण आचरणाने 'ख्रिस्ती' अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे हिंदूंची संघटित राजकीय शक्ती क्षीण होत आहे. चंद्राबाबू नायडू यांची घोषणा याच 'असंतुलना'कडे निर्देश करते. जर हिंदू समाज संख्यात्मक दृष्टीने मागे पडला, तर लोकशाहीत 'डोकी मोजली जातात', या न्यायाने हिंदूंचे राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व न्यून होऊ शकते; म्हणूनच लोकसंख्या वाढवण्याचे आवाहन हे केवळ आकड्यांसाठी नसून ते 'सामाजिक अस्तित्व' टिकवण्यासाठी असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात आहे. येथे कळीचा प्रश्न हा आहे की, या आर्थिक प्रोत्साहनाचा लाभ नेमका कुणाला होणार? धार्मिक संस्कार आणि नियम यांच्या पालनामुळे हिंदूंची लोकसंख्यावाढ खुंटली आहे. जर हिंदु समाजाने या योजनेचा लाभ घेऊन संख्या वाढवली नाही, तर हा पैसा पर्यायाने इतर समुदायांकडेच जाईल. ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून आधीच आर्थिक साहाय्य मिळवणाऱ्या धर्मांतरित गटांना आता सरकारी साहाय्यही मिळाले, तर त्यांची संख्या वेगाने वाढेल. जर केवळ अल्पसंख्यांक समुदायानेच मुले वाढवली, तर हिंदूंचा टक्का अधिक वेगाने घसरेल आणि नायडूंचा हा निर्णय हिंदूंसाठी 'भस्मासुर' ठरू शकतो.केवळ पैसे देऊन प्रश्न सुटणार नाही. जोपर्यंत 'समान नागरी कायदा' आणि 'लोकसंख्या नियंत्रण कायदा' होत नाही, तसेच धर्मांतरावर कडक बंदी घातली जात नाही, तोपर्यंत अशा योजनांचा अपलाभ राष्ट्रविघातक शक्ती किंवा धर्मांतरित गट घेण्याची शक्यता अधिक असते. 'हे कायदे का केले जात नाहीत?', असा प्रश्न हिंदूंनी सरकारांना विचारणे आवश्यक झाले आहे. हिंदूंच्या संघटनाही याविषयी काहीच बोलतांना दिसत नाहीत. यातून अन्य धर्मियांपेक्षा हिंदूच हिंदूंचे खरे वैरी आहेत, असे म्हटले, तर चुकीचे ठरत नाही. सध्या देशात जनगणना चालू झाली आहे, याची आकडेवारी १-२ वर्षांत समोर येईल. तेव्हा देशाची खरी लोकसंख्या काय आहे आणि कोण कुठे आहे, हे समोर येईल. त्यानंतर तरी सरकार जागे होऊन काहीतरी करील, अशी अपेक्षा ठेवावी लागेल. दुसरीकडे हिंदु समाजाने आता जागृत होऊन केवळ 'एक अपत्य' या पाश्चात्त्य मानसिकतेतून बाहेर पडणे आवश्यक आहे. लोकसंख्या वाढवतांना ती सुसंस्कृत, धर्मनिष्ठ आणि राष्ट्रप्रेमी असेल, तरच ती देशाचे सामर्थ्य ठरेल, अन्यथा केवळ आकड्यांची वाढ ही हिंदूंच्या विनाशाला आमंत्रण ठरू शकते!

कोकणी मुलं बोर्डात हुशार, स्पर्धा परीक्षांमध्ये माघार!



गेल्या जवळपास 15 वर्षांपासून दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांमध्ये कोकणचीच मुलं बाजी मारत असल्याचे निकालाच्या दिवशी आपल्याला पाहायला मिळते. एकेकाळच्या प्रसिद्ध लातूर पॅटर्नला पिछाडीवर टाकत कोकण विभागाने बोर्ड परीक्षांच्या निकालामध्ये मोठी प्रगती जरूर केली आहे. मात्र, याच बोर्डाच्या परीक्षांमध्ये बाजी मारणारी ही बहुतांश हुशार कोकणी मुलं विविध स्पर्धा परीक्षांपासून मात्र चार हात लांबच राहत आहेत. परिणामी, आयएएस, आयपीएस आदींसारख्या महत्त्वाच्या पदापर्यंत कोकणी माणूस फारसा दिसत नाही.

दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांचे निकाल जाहीर होताच कोकण विभागच अव्वल, कोकणची मुलं हुशार आणि मुलींचीच बाजी आदी ठरलेल्या शीर्षकांनुसार बातम्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्या. राज्यातील इतर सर्व विभागांपैकी कोकण विभागाने दरवर्षी बोर्डाच्या परीक्षांमध्ये बाजी मारणे, हे जणू काही एक समीकरणच बनून गेल्याचे वाटायला लागले आहे. गेल्या जवळपास 15 वर्षांपासून कोकण विभाग बोर्डाच्या परीक्षांमध्ये आपले वर्चस्व टिकवून आहे. यापूर्वी बोर्डाच्या परीक्षांमध्ये लातूर पॅटर्नचे एकेकाळी वर्चस्व होते. परंतु, आता मात्र तो पूर्णपणे नामशेष झाला असून लातूर विभाग तर अनेकदा शेवटच्या स्थानी असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. कोकण विभागाचा जवळपास 90 टक्क्यांहून अधिक लागणारा निकाल आणि गुणवत्तेच्या यादीत चमकणारी कोकणची मुलं-मुली राज्यासाठी कौतुकाचा विषय जरूर ठरतात. परंतु, कालांतराने मात्र हे चित्र पूर्णपणे पालटल्याचे पाहायला मिळते. जेव्हा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अतिशय आव्हानात्मक स्पर्धा परीक्षांच्या निकालांबाबत बोलायचे झाल्यास तेव्हा कोकणी मुलांची एक मोठी पोकळी जाणवल्याशिवाय राहत नाही. दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांमध्ये बाजी मारणारी ही हुशारी आयएएस, आयपीएस, आयआरएस, सीए, सीएस आदींसारख्या उच्च पदांपर्यंत पोहोचण्याच्या परीक्षांपर्यंत का थबकते, कोकणच्या मुलांची हुशारीची गुणवत्ता अशावेळी नेमकी जाते कुठे, या प्रश्नांचा वेध घेणे गरजेचे आहे.

निसर्गसंपन्न प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोकणात शिक्षणाचे प्रमाण हे चांगले असल्याचे आपल्याला निकालाच्या आकडेवारीवरून दिसते. शिक्षणाच्या बाबतीत कोकण काही मागासलेला नसून त्याची वाटचाल प्रगतीच्या दिशेने होत आहे, हे दरवर्षी बोर्डाच्या परीक्षांच्या निकालांवरून सहजपणे स्पष्ट होते. कोकणातील पालकांमध्ये मुलांच्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाबाबत कमालीची जागरूकता असल्यानेच कोकण विभाग हा गेल्या काही वर्षांपासून बोर्डाच्या परीक्षांमध्ये अव्वल येण्याची किमया साधत आहे. प्रत्येक नाही, परंतु बहुतांश कोकणी जनांचे शिस्त, चिकाटी आणि अभ्यासू वृत्ती हे नैसर्गिक गुण आहेत. त्यामुळेच विद्यार्थ्यांमध्येही अशा सवयी आपसूकच अंगी पडतात. राज्यातील इतरत्र भागात सामूहिक कॉपीसारखे प्रकार अनेकदा पाहायला मिळतात. परंतु, कोकणात कधी असे झालेले पाहायला मिळत नाही. आपल्या नैसर्गिक गुणांप्रमाणेच मेहनतीच्या जोरावरच यश कमावण्यावर विद्यार्थ्यांचा भर असतो. त्यामुळेच कोकणातील विद्यार्थी अभ्यासावर अधिक भर देऊन बोर्डाच्या परीक्षांमध्ये यशस्वी होताना दिसतात. कोकणातील विद्यार्थी बोर्ड परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवत असले तरी पुढील अभ्यासक्रमात मात्र तितके उंच शिखर गाठताना दिसत नाहीत. दहावी-बारावीत मिळणारे यश हे प्रामुख्याने पाठांतर आणि निश्चित अभ्यासक्रम यावर आधारित असते. स्वबुद्धीने विचार करून सोडविर्णाया आवाहनात्मक प्रश्नांचे प्रमाण कमी असते. त्यामुळे येथे विद्यार्थी झपाट्याने यश मिळविताना दिसतात. परंतु, त्यानंतरचे पदवीचे, अभियांत्रिकीचे, वैद्यकीय शिक्षण तसेच स्पर्धा परीक्षांचे स्वरूप यापेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. येथे केवळ पुस्तकी पाठांतरीत ज्ञान पुरेसे नसते. तर, चालू घडामोडींचे ज्ञान आणि विश्लेषणात्मक विचार करण्याची क्षमता आवश्यक असते. कोकणातील विद्यार्थी शैक्षणिक पद्धतीत गुणांवर अधिक लक्ष केंद्रित करतात आणि झटपट नोकरी मिळविण्याकडे त्यांचा कल असतो. पण, उच्च प्रशासकीय स्तरावरील महत्त्वाच्या पदापर्यंत पोहोचण्याचा दृष्टिकोन विकसित करण्यात कुठेतरी ते मागे पडतात.

यासाठी केवळ विद्यार्थ्यांना दोष देऊन चालणार नाही. त्यांना याबाबत योग्य मार्गदर्शन मिळत नाही. यासाठी कोणी प्रेरित देखील करत नाहीत. स्पर्धा परीक्षांबाबत माहितीचा अभाव त्यांच्यामध्ये जाणवतो. कोकणाच्या तुलनेत इतरत्र मात्र वेगळी परिस्थिती आहे. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा येथील विद्यार्थी मात्र स्पर्धा परीक्षांसाठी आधीपासूनच प्रयत्नशील असतात. पुणे किंवा दिल्लीसारखी शहरे स्पर्धा परीक्षांचे माहेरघर मानली जातात. तिथे पदोपदी मिळणारे मार्गदर्शन, अद्ययावत ग्रंथालये, अभ्यासिका, खासगी क्लासेस आदीमुळे स्पर्धा परीक्षांसाठी जनजागृती मोठ्या प्रमाणावर होते. कोकणात अद्यापही हे पॅटर्न पूर्णपणे विकसित झालेले नाही. कोकणातील ग्रामीण भागात आजही अनेक विद्यार्थ्यांना आयएएस किंवा आयपीएस होण्यासाठी नेमकी कोणती परीक्षा द्यावी लागते, याचे योग्य मार्गदर्शन मिळत नाही. गुणवत्ता असूनही निव्वळ माहितीअभावी ही मुले झटपट पदव्यांकडे किंवा नोकऱ्यांकडे वळतात. पदवी पूर्ण झाली की लगेच मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये जाऊन एखादी बऱ्यापैकी नोकरी मिळवणे, हे कोकणातील बहुतांश तरुणांचे ध्येय असते. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने लांबवरचा विचार करण्याऐवजी हाताला येईल ती पहिली नोकरी स्वीकारण्याकडे कल असतो. स्पर्धा परीक्षांसाठी किमान 2 ते 3 वर्षे पूर्णवेळ अभ्यासाची आणि संयमाची गरज असते. वेगवान आयुष्यात किंवा आर्थिक जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली हा संयम टिकवणे कोकणी तरुणांना कठीण जाते. यामुळेच उत्तम टक्केवारी असणारी ही मुले कॉर्पोरेट जगतात किंवा खासगी नोकऱ्यांमध्ये स्थिरावतात, पण प्रशासकीय सेवेचा विचार मागे पडतो. कोकणातील भौगोलिक रचना आव्हानात्मक आहे. पावसाळ्यातील चार महिने, नेटवर्कचे प्रश्न, दळणवळणाच्या मर्यादित सोयी यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शनाचा लाभ घेणे कठीण होते. शहरात जाऊन राहण्याचा खर्च परवडणारा नसल्याने अनेक हुशार मुले स्थानिक स्तरावरच उपलब्ध असलेल्या पर्यायांचा स्वीकार करतात. आव्हाने फक्त कोकणातच आहेत, असे नाही. इतर प्रदेशांमध्येही आव्हाने आहेत. परंतु, इतरांच्या तुलनेत मानसिक जडणघडण आणि धाडसाची कमतरता असल्यानेच कोकणी विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत मागे पडतात.

प्रशासकीय सेवांमध्ये जाण्यासाठी एक प्रकारचे धोरणी धाडस लागते. कोकणी माणूस स्वभावाने प्रामाणिक, कष्टाळू पण काहीसा उदासीन आहे. आपल्याला हे जमेल का? किंवा एवढ्या मोठ्या परीक्षेला आपण सामोरे जाऊ शकू का? ही न्यूनगंडाची भावना अनेकदा अडसर ठरते. उत्तर भारतातील किंवा पश्चिम महाराष्ट्रातील मुलांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी जे सामाजिक आकर्षण आणि ओढ दिसते, ते कोकणात निर्माण होण्यासाठी अजून काही काळ जावा लागेल.

कोकणची हुशारी वाया जात नाही, ती फक्त इतर क्षेत्रांमध्ये विखुरली जाते. तिला योग्य दिशा देण्यासाठी विविध उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. शालेय स्तरावर मुलांना याबाबत जाणीव करून देणे आवश्यक आहे. तरच कोकणातील मुलांमध्ये स्पर्धा परीक्षांबाबत जनजागृती निर्माण होईल. केवळ दहावी-बारावीच्या गुणांचे कौतुक न करता, प्रशासकीय सेवांमधील करिअरच्या संधींबाबत माध्यमिक शाळेपासूनच विद्यार्थ्यांना माहिती देणे आवश्यक आहे. कोकणात विविध ठिकाणी स्थानिक स्तरावर अभ्यासिका उभारण्याची गरज आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग यांसारख्या जिल्हा केंद्रांवर अद्ययावत ग्रंथालये आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे उभारणे गरजेचे आहे. विविध यशवंतांचा आदर्श घालून देणे गरजेचे आहे. कोकणातील जे तरुण आयएएस किंवा आयपीएस झाले आहेत, त्यांच्या यशोगाथा स्थानिक स्तरावर पोहोचवणे गरजेचे आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल. गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ मिळणे आवश्यक आहे. हुशार आणि गरजू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना सुरू झाल्यास परिस्थिती बदलल्याशिवाय राहणार नाही. कोकणच्या मातीत चिकाटी आणि बुद्धिमत्ता दोन्ही ठासून भरलेली आहे. दहावी-बारावीत येणारे यश हे त्याचेच द्योतक आहे. मात्र, या यशाचे रुपांतर प्रशासकीय यशात करण्यासाठी प्रयत्न जरूर करावे लागतील. ज्या दिवशी कोकणचा तरुण वर्ग झटपट नोकरी मिळवणे या ध्येयाकडून प्रशासन चालवणे या ध्येयाकडे वळेल, त्यादिवशी आयएएस आणि आयपीएसच्या यादीत कोकणचा टक्का नक्कीच वाढलेला दिसेल. कोकणची मुले मुली हुशारच आहेत, पण त्या हुशारीला योग्य दिशा देण्याची गरज आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा, मार्गदर्शन आणि प्रशिक्षण केंद्रे उभारायला हवीत. त्यासाठी राजकीय नेत्यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. कोकणी नेत्यांची उदासीनता आणि एखाद्या मोठ्या उलाढालीसाठी लागणाऱ्या संघटित शक्तीचा अभाव कोकणच्या मागासलेपणाला कारणीभूत आहे. दहावी-बारावीनंतर नेहमी कोकणची पोरं हुशार, असा मन आंनदित करणारा जयघोष ऐकू येतो, तेव्हा मनाला खूप समाधान वाटते. पण गेल्या १५-२० वर्षांचा आढावा घेतला तर ही हुशार मुले गेली कुठे हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. काही अपवाद सोडले तर कुठल्याच मोठ्या पदांवर ती हुशार मुले नावारुपाला आलेली दिसत नाहीत.

चिंताजनक 'हवा'



ठरावीक वर्षांनी 'एल निनो' सक्रिय होतो आणि त्याचे परिणामही त्या-त्या वर्षी भोगावे लागत असले, तरी यंदा तो अधिक तीव्र असण्याच्या शक्यतेने चिंता वाढवली आहे.

पश्चिम आशियातील युद्धाचे ढग पुरते विरळ झालेले नसताना आणि त्यामुळे इंधन संकटापासून अर्थव्यवस्थेपर्यंत त्याचा फटका सहन करावा लागत असताना; तसेच देशातील बहुतांश भाग चाळीस अंश तापमानाने भाजून निघत असताना, यंदा मान्सून केरळ किनारपट्टीवर तुलनेने लवकर (म्हणजे एक जूनच्या ऐवजी २६ मे रोजी) थडकणार, ही बातमी खरे तर दिलासादायक ठरायला हवी. मात्र, त्याच वेळी मान्सूनवर विपरीत परिणाम करणारा 'एल निनो'नामक घटकही आधीच्या अंदाजापेक्षा लवकर सक्रिय होणार असल्याने दिलासा वाटण्याऐवजी चिंता वाढली आहे.

जून ते सप्टेंबर दरम्यान हमखास पडणारा मोसमी पाऊस म्हणजेच मान्सून हे भारताचे ठळक वैशिष्ट्य. आजही देशाची अर्थव्यवस्था मोठ्या अंशी मान्सूनवरच अवलंबून आहे. सागरी पृष्ठभागाचे तापमान, तेथील दाब, वारा आदी विविध घटकांवर असलेला पाऊस हवामानाप्रमाणेच लहरी. त्यामुळे तो कधी जोरात बरसतो, तर कधी पाठ फिरवतो. तो जोरात झाल्यास शेतात आणि बाजारपेठेत चैतन्य निर्माण होते; अन् पुरेसा न झाल्यास तोंडचे पाणी पळते.

यंदाच्या मान्सूनवर सावट आहे, ते 'एल निनो'चे. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान वाढल्यामुळे हा घटक सक्रिय होतो आणि त्यामुळे दक्षिण अमेरिकेत अतिवृष्टीची, तर भारतात अवर्षणाची शक्यता निर्माण होते. या वर्षी 'एल निनो' सक्रिय होणार याची कल्पना असल्याने हवामान विभागाने आधीच 'दीर्घकालीन सरासरी'पेक्षा कमी म्हणजे ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तविला आहे. हा 'एल निनो' जूनमध्येच सक्रिय होणार असल्याने आणि प्रशांत महासागराचा पृष्ठभाग दोन अंश सेल्सिअसपेक्षाही अधिक तापण्याची भीती असल्याने अवर्षणाची शक्यता आणखी वाढली आहे. त्यामुळे यंदाचा पावसाळा चिंताजनक आणि आव्हानात्मक असू शकतो.

विषुवृत्तीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा ०.५ अंश सेल्सिअसने अधिक असल्याकडे हवामान शास्त्रज्ञ लक्ष वेधत आहेत. हे वाढीव तापमान म्हणजे 'एल निनो' अपेक्षेहून अधिक लवकर सक्रिय होण्याचे लक्षण. आधीच्या वर्षातील तापमान कमी होण्याचे आणि ते परत वाढण्याचे चक्र यंदा अधिक वेगाने फिरत असून, ही असामान्य घटना असल्याचे मानले जाते. याचा अर्थ 'एल निनो' अधिक तीव्र असणार. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान १.५ अंश सेल्सिअसहून अधिक झाल्यास 'एल निनो' तीव्र झाला, असे मानले जाते. त्या स्थितीस 'सुपर एल निनो'ही म्हणतात.

ही घटना प्रशांत महासागरातील असली, तरी तिचे हवामानशास्त्रीय परिणाम साऱ्या जगावर होतात. यामुळे दक्षिण अमेरिकी देशांत अतिवृष्टी होऊन पूर येण्याची, त्यात पिके वाहण्याची आणि मानवी संकट गडद होण्याची भीती असते; तर भारतात मोसमी पाऊस कमी होतो, अनेक ठिकाणी तो बरसतच नाही, तापमान वाढते; त्यामुळे पाण्याच्या दुर्भिक्ष्याची, पिके न येण्याची आणि महागाईची शक्यता अधिक असते. या शक्यता लक्षात घेऊन उपाययोजना आखण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे आपत्कालीन उपायांबद्दल भरभरून बोलले जात असले आणि कागदावर योजना आखल्या गेल्या असल्या, तरी प्रत्यक्षात त्यांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही, असा आजवरचा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर 'एल निनो'मुळे येऊ घातलेल्या संकटाकडे पाहावे लागेल.

दहा वर्षांपूर्वी म्हणजे २०१५-१६ या काळात ह्याएल निनोह्लचा प्रभाव होता आणि त्यामुळे एकूण सरासरीच्या ८६ टक्केच पाऊस झाला होता. त्या वेळी महाराष्ट्रात, विशेषतः मराठवाड्यात खूपच कमी पाऊस झाला होता. पाण्याचे मोठे संकट निर्माण झाले होते. त्या वेळी लातूरला रेल्वेने पाणी पुरवण्याची वेळ आली होती. २०२३मध्येही 'एल निनो' होता; त्या वेळी ऑगस्ट महिन्यातील पावसावर मोठा परिणाम झाला होता. त्या महिन्यात ३६ टक्के पाऊस कमी झाला होता. हा अनुभव लक्षात घेऊन धोरणकर्त्यांना उपाय योजावे लागतील.

प्रशांत महासागराप्रमाणेच हिंदी महासागराच्या तापमानाचाही मान्सूनवर परिणाम होत असतो. हिंदी महासागराच्या पश्चिमेकडील पृष्ठभाग अधिक तापल्यास 'इंडियन ओशिएन डायपोल' नावाचा घटक तयार होतो आणि तो मान्सूनला पूरक असतो, असे मानले जाते. यंदा हा घटकही सक्रिय असण्याची शक्यता असल्याने थोडीफार आशादायक स्थिती आहे; परंतु प्रतिकूलतेची शक्यता गृहीत धरून, येणाऱ्या कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी पावले उचलायला हवीत.

नाशिक जिल्हा गुन्हेगारांचा बालेकिल्ला?

नाशिकला गुन्हेगारांचा बालेकिल्ला होण्यापासून वाचवणे ही केवळ पोलिसांची जबाबदारी नाही, ती प्रत्येक नाशिककरांची जबाबदारी आहे. नाशिक जिल्हा गुन्हेगारांचा बालेकिल्ला होऊ द्यायचा नसेल तर तातडीने पावलं उचलायला हवीत.







हाराष्ट्राची धार्मिक राजधानी, द्राक्षांचे माहेरघर, पवित्र गोदावरीच्या तटावर वसलेले नाशिक हे शहर आणि हा जिल्हा गेल्या काही महिन्यांत एका वेगळ्याच कारणाने राज्यभर चर्चेचा विषय बनला आहे. भोंदूबाबाचे थरारक प्रकरण, टीसीएस कार्यालयातील लैंगिक छळ आणि धर्मांतराचे षडयंत्र आणि आता नीट पेपरफुटीचे नाशिक कनेक्शन या तिन्ही प्रकरणांनी नाशिकची प्रतिमा मलीन केली. हा केवळ योगायोग आहे का, की नाशिक जिल्हा खरोखरच गुन्हेगारांचा बालेकिल्ला बनत आहे?

नाशिक जिल्ह्यातील तीन पूर्णपणे वेगळ्या स्वरूपाच्या या घटनांमध्ये एक समान धागा आहे. सुरक्षित असण्याचा दावा करणाऱ्या जागांमध्येच सर्वांत मोठा धोका दडलेला होता. देवाच्या नावावर घरात, कामाच्या ठिकाणी आणि परीक्षा केंद्रात गुन्हेगारांनी प्रत्येक विश्वासाचा दुरुपयोग केला. हे तीन गुन्हे म्हणजे नाशिकमधील प्रशासकीय ढिसाळपणा, राजकीय संरक्षण आणि यंत्रणांच्या अपयशाचे तीन आरसे आहेत.

भोंदूबाबा अशोक खरात श्रद्धेचे शस्त्र

मार्च २०२६ मध्ये नाशिक ग्रामीण पोलिसांनी अशोक खरात याला बलात्काराच्या आरोपाखाली अटक केली आणि नाशिकच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र हादरला. स्वयंघोषित ज्योतिषी, दैवी शक्तींचा दावेदार, फार्महाऊसवर यज्ञ-होम करणारा हा 'बाबा' प्रत्यक्षात एक कसलेला गुन्हेगार होता. महिलांची धार्मिक श्रद्धा, भविष्याची भीती आणि नातेसंबंधांतील अडचणी यांचा गैरफायदा घेत त्याने अनेक महिलांवर अत्याचार केले. तपास पथकाला अशोक खरातच्या मोबाईलमधून हवाला रॅकेटशी संबंधित धागेदोरे सापडले. त्याच्या फार्महाऊसवर चक्क १२ वर्षांपूर्वी दिलेल्या शस्त्र परवान्याखाली ठेवलेली काडतुसे आढळली त्यातील पाच वापरलेली होती. जानेवारी २०२४ मध्ये या परवान्याचे नूतनीकरणही करण्यात आले होते. एका भोंदूबाबाला शस्त्र परवाना कोणी दिला, का दिला हे प्रश्न नाशिक जिल्हा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर थेट प्रश्नचिन्ह निर्माण करतात. परंतु या प्रकरणातील सर्वात गंभीर पैलू म्हणजे खरातचे राजकीय कनेक्शन. अटकेनंतर सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटोंनी सर्वपक्षीय नेत्यांचे त्याच्याशी असलेले संबंध उघड केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीचे सुनील तटकरे अक्षरशः सर्व पक्षांच्या नेत्यांसोबत त्याचे फोटो होते. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या नावाचाही उल्लेख झाला. महिलांचे रक्षण करण्याची शपथ घेतलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षच जर महिला अत्याचार करणाऱ्याशी जवळीक बाळगत असतील, तर व्यवस्था नेमकी कोणासाठी काम करते? राजकीय संरक्षणाच्या जाळ्यात अडकलेल्या या प्रकरणात न्याय किती खोलवर जाईल, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

टीसीएस-निदा खान प्रकरणात कार्यालय बनले अत्याचाराचे अड्डे

'टीसीएस' म्हणजे देशातील सर्वांत मोठ्या आयटी कंपन्यांपैकी एक टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस. नाशिकमधील टीसीएस बीपीओ कार्यालयात एप्रिल २०२६ मध्ये उघडकीस आलेला घोटाळा देशाला अवाक करणारा होता. कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांवर लैंगिक छळ, मानसिक यातना आणि धर्मांतराची सक्ती केल्याचे गंभीर आरोप निदर्शनास आले. हे आरोप २०२२ ते २०२६ या चार वर्षांच्या कालावधीतील होते. नाशिक पोलिसांनी एसआयटी स्थापन केली आणि सहा महिला पोलीस अधिकाऱ्यांना ४० दिवस कर्मचारी म्हणून कार्यालयात गुप्तपणे तैनात केले. तपासात नऊ एफआयआर नोंदवण्यात आल्या. पोष समितीचा एक सदस्य असताना त्याने तोंडी तक्रार ऐकूनही कार्यवाही न केल्याचा ठपका त्याच्यावर आहे. पोष म्हणजे कार्यस्थळावरील महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण, प्रतिबंध आणि निवारण कायदा, २०१३. ९ डिसेंबर २०१३ रोजी कायदा अंमलात आला. या प्रकरणाची मुख्य आरोपी निदा खान ही मात्र २५ मार्चपासून फरार होती. ७ मे २०२६ रोजी नाशिक पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमधून तिला अटक केली. निदा खानवर महिलांचा लैंगिक छळ, मानसिक यातना आणि इस्लाममध्ये धर्मांतरास भाग पाडल्याचे आरोप आहेत. ही घटना केवळ गुन्ह्याची नाही, ती कार्यालयीन व्यवस्थेच्या ढासळण्याचीही आहे. पोष कायद्यांतर्गत प्रत्येक कार्यालयात तक्रार समिती असणे बंधनकारक आहे, परंतु ती केवळ कागदावरच राह

पनीर-पुदिना कटलेट

साहित्य : २५० ग्राम ताजं पनीर, १/२ कप शिंगाड्याचे पीठ, २-३ हिरव्या मिरच्या, १/२ चमचा वाळवलेली पुदिन्याची पूड, १/२ चमचा लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, उपवासाचे मीठ चवीप्रमाणे.

कृती : पनीर कटलेट्स करण्यासाठी सर्वप्रथम पनीरला किसून घ्या. हिरव्या मिरच्यांना बारीक चिरून शिंगाड्याच्या पिठात पनीर आणि मिरच्या घाला. आता उरलेले साहित्य वाळवलेली पुदिन्याची पूड, लिंबाचा रस, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून त्याला मिक्स करून हवे त्या आकाराचे कटलेट करा. तवा गरम करून त्यावर थोडे तूप किंवा शेंगदाण्याचे तेल टाकून दोन्हीकडून कुरकुरीत खमंग शॅलो फ्राय करून घ्या. तयार कटलेट्सला दही किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.



आपल्या स्वयंपाकघरातच आहेत सौंदर्यप्रसाधने



तुमच्या केसांपासून ते पायांच्या नखांपर्यंत सर्व गोष्टींची निगा राखण्यास मदत करण्यासाठी विविध तऱ्हेची सौंदर्यप्रसाधने बाजारामध्ये उपलब्ध आहेत. पण या सर्व प्रसाधनांमध्ये अगदी कमी प्रमाणात का होईना, पण रसायने असतातच. त्यामुळे क्वचितप्रसंगी या सौंदर्यप्रसाधनांमुळे ॲलर्जीदेखील उद्भवू शकते. हा धोका टाळायचा असेल, तर घरी तयार केलेली, नैसर्गिक पदार्थ असलेली प्रसाधने वापरणे कधीपण अधिक सोयीस्कर आणि फायद्याचे असते. घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडाफार वेळ खर्ची घालावा लागत असला, तरी त्यापासून आपल्या त्वचेला किंवा केसांना मिळणारे फायदे पाहता, घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडा वेळ जरूर द्यावा.



ऑलिव्ह ऑईल : नैसर्गिक मेकअप रिमूव्हर म्हणून ऑलिव्ह ऑईलचा वापर करावा. मेकअपसाठी वापरण्यात येणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये थोड्या प्रमाणात ॲस्ट्रिंजंट असते, ज्यामुळे आपली त्वचा कोरडी पडू लागते. मेकअप उतरवण्याकरिता ऑलिव्ह ऑईल वापरल्याने मेकअप संपूर्णपणे साफ होतोच, पण त्याशिवाय त्वचेचा कोरडेपणा दूर होऊन, त्वचेला आर्द्रता मिळते.

टोमॅटो : त्वचेची निगा राखण्याकरिता प्रत्येक वेळी ब्युटी पार्लरकडे धाव न घेता, घरच्या घरीच उत्तम फेस मास्क तयार करावा. नितळ, सुंदर त्वचेकरिता टोमॅटो अतिशय चांगला पर्याय आहे. टोमॅटोमधील 'अ' जीवनसत्त्व त्वचेवरील डाग हलके करण्यास सहाय्यक आहे. तसेच यामध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असल्याने त्वचेचा पोत सुधारून, त्वचा चमकदार बनते. हा मास्क बनवण्याकरिता एका टोमॅटोची पेस्ट चेहऱ्यावर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवावा. या उपायाने त्वचा त्वरित उजळते.

साखर : थंडीमध्ये किंवा उन्हाळ्यामध्ये ओठ कोरडे पडून खरखरीत होतात. याचा उपाय आपल्या स्वयंपाकघरामध्ये अगदी सहज उपलब्ध आहे, तो म्हणजे साखर. साखरेमुळे त्वचेवरील मृत पेशी हटवल्या जाऊन, त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढते. याकरिता एक टीस्पून खोबरेल तेलामध्ये एक लहान चमचा मध मिसळावा. या मिश्रणात दोन मोठे चमचे साखर घालून, मग थोडासा लिंबाचा रस घालावा आणि हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करावे. ही तयार झालेली पेस्ट ओठांवर हळुवार गोलाकार चोळावी. दहा मिनिटे ही पेस्ट ओठांवर राहू देऊन, त्यानंतर पाण्याने धुवून टाकावी. ओठ टॉवेलने हळुवार कोरडे करून व्हॅसलिन लावावे. या उपायाने ओठ नेहमी मृदू राहतील.

नारळ : नारळाच्या दुधामध्ये 'ई' जीवनसत्त्व व केसांना पोषक नैसर्गिक तेले मुबलक मात्रेमध्ये असतात. ॲवोकाडोमध्ये केसांच्या पोषणासाठी आवश्यक प्रथिने व केसाच्या मुळांना पोषक तत्त्वे असतात. नारळाचे दूध व ॲवोकाडो वापरून तयार केलेला मास्क केसांसाठी वापरला असता, केस चमकदार आणि मुलायम बनतात. हा मास्क तयार करण्यासाठी ॲवोकाडो आणि नारळाचे दूध एकत्र करून त्यांची पेस्ट तयार करावी. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत व्यवस्थित लावून घ्यावी. अर्धा तास ही पेस्ट केसांवर राहू देऊन त्यानंतर केस धुवावेत. या हेअर मास्कमुळे केसांच्या मुळांना ताकद मिळून, केसांची वाढ चांगली होते.

मध आणि बदामाची पूड : हात कोरडे पडून रखरखीत होत असल्यास त्यासाठी मास्क घरच्या घरी तयार करता येतो. एक लहान चमचा मधात थोडा लिंबाचा रस घालावा. त्या मिश्रणामध्ये एक मोठा चमचा बदामाची पूड व एक लहान चमचा अक्रोडची पूड घालावी. अक्रोडची पूड नसल्यास एक चमचा सूर्यफुलाचे तेल घालावे व हे मिश्रण हाताना चोळावे. पाच मिनिटांनी हात गार पाण्याने स्वच्छ धुवून टाकावेत. या उपायाने हात मुलायम राहतील.

शहाळे : आरोग्याचा खजिना



कोवळा नारळ सर्वांनाच आवडतो. पण तो आरोग्यदायी घटकांचा खजिना असतो हे अनेकांना माहीत नसते. मोठे सेलिब्रिटीज, चित्रपट अभिनेते आणि अभिनेत्रींनाही नारळाच्या पाण्याचे महत्त्व कळते. अर्थात ते त्यांना कळते आणि ते हॉटेलातल्या महागड्या पेयांपेक्षाही शहाळे पिणे पसंत करतात. सामान्य लोकांनी त्यांचे अनुकरण म्हणून नाही पण नारळाचे महत्त्व समजून घेऊन त्याचा समावेश आपल्या रोजच्या आहारात केला पाहिजे. कोवळा नारळ हे निसर्गाने आपल्याला दिलेले वरदान आहे. २००६ साली करण्यात आलेल्या एका पाहणीनंतर शहाळ्याची वैशिष्ट्ये जर्नल ऑफ मेडिसिनल फूड या मासिकांत प्रकाशित करण्यात आली होती. त्यात शहाळ्याने शरीरातले कोलस्टेरॉल कमी होते असे म्हटले होते.

आपल्याला निसर्गाने नारळातून जे काही अनमोल असे दिले आहे त्यात कोणीही कसलीही भेसळ करू शकत नाही, हे त्याचे खास वैशिष्ट्य आहे. नारळाचे पाणी नेहमीच फ्रेश असते. ते कधी शिळे होत नाही. ते थंड असते. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास त्याचा उपयोग होतो. एकदा याबाबत एक पाहणी करण्यात आली असता असे लक्षात आले की, पाहणीत गुंतलेल्या रुग्णांपैकी ७१ टक्के रुग्णांचा रक्तदाब कसलीही औषधे न देता केवळ शहाळ्याच्या पाण्याने कमी झाला. शहाळ्यातल्या मॅग्नेशियममुळे इन्सुलीन सेन्सिटीव्हिटी वाढते आणि मधुमेहाच्या रुग्णाला दिलासा मिळतो. ब्लड शुगर लेव्हल कमी होते. नारळाच्या पाण्यातले सोडियम आणि काही जीवनसत्त्वे ही ब्लड शुगर कमी करण्यास मदत करीत असतात. हे पाणी फ्री पार्टिकल्स आणि क्रिस्टल्स तयार करण्यास प्रतिबंध करते त्यामुळे किडनी स्टोन तयार होण्याचे टळते. काही कारणाने आणि अन्नात दोष निर्माण झाल्याने पचनशक्तीवर काही विपरीत परिणाम झाला असेल तर नारळाचे पाणी दिवसातून दोन वेळा प्यावे त्यामुळे पचनशक्ती ताळ्यावर यायला मदत होते. कारण या पाण्यात तंतुमय पदार्थ मोठ्या प्रमाणावर असतात. काही वेळा जुलाब होतात आणि डीहायड्रेशन होते. अशा वेळी नारळाचे पाणी प्यावे त्यामुळे शरीरातले पाण्याचे प्रमाण वाढते आणि डीहायड्रेशनमुळे आलेला अशक्तपणा कमी होतो. या पाण्याने चेहऱ्यावर तकाकी येते. केसही चांगले होतात. जगात गाजलेल्या काही टेनिसपटूंनी आपल्या तंदुरुस्तीचे रहस्य कोकोनट वॉटर हेच असल्याचे म्हटले होते. काही मॅरेथॉनपटूंनीही शहाळ्याला श्रेय दिले होते.



मागील काही वर्षांत भारतात ग्रीन टीचे सेवन अधिक वाढले आहे. ग्रीन टी आरोग्यासाठी चांगले आहे, यात शंकाच नाही. ग्रीन टीमध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडेंट्स असतात. जे शरीरातील मेटाबॉलिज्म सुधारते, कॉलेस्ट्रॉल कमी करते. ग्रीन टी जिंक, मॅग्नीज आणि व्हिटामीन ए, बी, सी ची मात्रादेखील असते. मात्र हे सर्व फायदे असले तरी ग्रीन टीच्या अतिसेवनामुळे आरोग्याला देखील नुकसान पोहोचते.

'ग्रीन टी'च्या अतिसेवनामुळे होऊ शकतात या समस्या



तोंडात फोडी येणे : ग्रीन टीमध्ये टॅनिंस तत्त्व असते. जास्त ग्रीन टी प्यायल्याले टॅनिंस त्वचा कोरडी पडणे, तोंड कोरडे पडणे, पोट दुखणे आणि तोंडात फोडी येणे यासारख्या समस्या होतात.

ब्लड प्रेशर वाढते : अधिक प्रमाणात ग्रीन टीचे सेवन केल्याने ब्लड प्रेशरचा देखील धोका निर्माण होतो. ग्रीन टीमध्ये कॅफिन अधिक मात्रेत असतात. याच्या अधिक सेवनाने हृदयावर दबाव पडतो व तुमचे ब्लड प्रेशर वाढते.

अशक्तपणा होऊ शकतो : ग्रीन टीमध्ये काही असे तत्त्व असतात, जे शरीरातील आयरनला (लोह) शोषून घेण्यापासून रोखते. त्यामुळे तुम्ही ग्रीन टीचे अधिक सेवन करत असाल तर तुम्ही ज्या पदार्थांचे सेवन करता त्यातील आयरन शरीराला मिळणार नाहीत. अशा परिस्थितीत रेड ब्लड सेल्स कमी होतात आणि अशक्तपणा येऊ शकतो.

मानसिक तणाव आणि चिंता वाढणे : ग्रीन टी तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. मात्र अति सेवनामुळे याचा उलट परिणाम होऊन मानसिक तणाव आणि चिंतादेखील वाढते.

गुणांचा खजिना - घृतकुमारी (ॲलोवेरा/कोरफड)

ॲलोवेरा आपल्या घरामध्ये किंवा ऑफिसमध्ये विनासायास लावता येण्यासारखे असते. आजकाल ॲलोवेराचे आरोग्याच्या दृष्टीने फायदे समोर यावयास लागल्याने रस, जेल अशा अनेक प्रकारे लोक ॲलोवेराचा उपयोग करताना दिसत आहेत. दात घासल्यानंतरही दातांमध्ये प्लाक किंवा किटाणू राहतातच. त्यामुळे तोंडामधून क्वचित दुर्गंधी येऊ लागते. ही दुर्गंधी येऊ नये यासाठी माऊथवॉश उपयोगात आणला जातो. ॲलोवेराच्या रसाचा वापरदेखील प्राकृतिक माऊथवॉश म्हणून करता येतो. या रसामुळे तोंडातील प्लाक आणि किटाणू दूर होऊन दातांचे आरोग्य चांगले राहते. ॲलोवेराचा वापर माऊथवॉश म्हणून केल्याने हिरड्याही बळकट होतात. कित्येकदा जेवण जास्त झाल्याने, जेवणाच्या वेळा गडबडल्याने किंवा जास्त तिखट, मसालेदार पदार्थ खाल्ल्याने छातीत जळजळ होत असल्याची भावना होते किंवा ॲसिडीटी होते. अशावेळी ॲलोवेराच्या रसाच्या सेवनाने फायदा होतो. यामुळे छातीतील जळजळ दूर होऊन ॲसिडीटीही कमी होते. तसेच दररोज सकाळी रिकाम्या पोटी ॲलोवेराचा रस कोमट पाण्यातून घेतल्यास पोट साफ होण्यास मदत होते. केस गळत असल्यास ॲलोवेराचा गर केसांना लावल्याने फायदा होतो. तसेच चेहऱ्यावर उष्णतेमुळे मुरुमे येत असल्यासही ॲलोवेराच्या गराने फायदा होतो. या गराने त्वचेचा रंग उजळण्यास व पोत सुधारण्यास मदत होते. त्याचमुळे पुष्कळशा स्कीन क्रीम्समध्ये ॲलोवेराच्या गराचा अंश मिसळलेला असतो. ॲलोवेराच्या गराच्या वापराने वयपरत्वे त्वचेवर आलेल्या सुरकुत्याही कमी होतात व त्वचा सुंदर दिसू लागते.



अनेक वर्ष एकच मोबाइल फोन वापरल्यामुळे तो स्लो होऊ शकतो. असा स्मार्टफोन काही ट्रिक्सच्या मदतीने फास्ट करता येतो. यात फॅक्ट्री रीसेट, अँड्रॉइड अपडेट, फोन स्टोरेज क्लियर करणे, लाइट ॲप्सचा वापर इत्यादी ऑप्शन आहेत.



जुन्या मोबाइल फोनचा स्पीड कसा वाढवायचा? जाणून घ्या सोप्या ट्रिक्स

असे अनेक लोक आहेत जे एक मोबाइल कमीत कमी ३-४ वर्ष वापरतात. विशेषतः मीडिल क्लास कुटुंबात युजर एकच स्मार्टफोन अनेक वर्ष वापरतात. परंतु स्मार्टफोन जुना झाल्यावर त्याची परफॉर्मन्सदेखील स्लो होऊ लागतो. त्यामुळे रोज फोन वापरताना समस्या येऊ लागतात. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही काही ट्रिक्स सांगितल्या आहेत ज्यामुळे जुन्या फोनचा स्पीड वाढू शकतो.

फॅक्ट्री रीसेटमुळे अनेक समस्या सोडवता येतात. फॅक्ट्री रीसेट तुमच्या स्मार्टफोनला पुन्हा फास्ट, स्मूद व नव्यासारखा बनवण्याची चांगली पद्धत आहे. स्मार्टफोन रीसेट करण्यापूर्वी तुमच्या मोबाइल फोनच्या डेटा बॅकअप घेणं आवश्यक आहे. तुम्ही मोबाइलमधील सर्व ॲप्स, फोटो, व्हिडीओ तसेच अन्य फाईल्स देखील तुमच्या डाटा बॅकअपमध्ये घेऊ शकता. फोन बॅकअप स्मार्टफोनमधील मायक्रोएसडी कार्ड किंवा गुगलमध्ये स्टोर केला जाऊ शकतो, त्यामुळे फोन फॅक्ट्री रीसेट झाल्यानंतर पुन्हा रिकव्हर करता येईल.

अँड्रॉइड अपडेट

अँड्रॉइड स्मार्टफोन्स गुगलद्वारे बनवण्यात येणाऱ्या अँड्रॉइड ओएसवर चालतात. ही कंपनी दरवर्षी आपल्या अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमचं नवीन व्हर्जन घेऊन येते ज्यात अनेक नवीन अपडेट असतात. विशेष म्हणजे अँड्रॉइड ओएसचा नवीन अपडेट फक्त नवीन फीचर्स घेऊन येत नाही तर त्यात अनेक बग्स काढले जातात. वेगवेगळ्या ॲप्स, वेबसाइट्स, गेम्स, ऑनलाइन ॲक्टिव्हिटी तसेच इंटरनेट ॲक्सेसमुळे तुमच्या स्मार्टफोनमध्ये अनेक प्रकारचे बग्स देखील येतात त्यामुळे फोनच्या प्रोसेसिंगवर एक्स्ट्रा लोड येतो. हे बग्स फक्त प्रोसेसिंग स्लो करत नाहीत तर अनेक ॲप्सवर देखील प्रभाव टाकतात. अँड्रॉइड अपडेट्समध्ये डेव्हलपर हे बग्स काढून टाकण्याचे कोड टाकतात. त्यामुळे तुमचा स्मार्टफोन कायम नवीन अँड्रॉइड व्हर्जनवर अपडेट करावा.

फोन स्टोरेज

फोनची स्टोरेज भरल्यामुळे डिव्हाइसच्या प्रोसेसिंगवर प्रभाव पडतो आणि तो स्लो होतो. Support.google नुसार जर तुमच्या स्मार्टफोनची स्टोरेज ९० टक्क्यांपर्यंत फुल होते तेव्हा फोनमध्ये प्रॉब्लम येण्यास सुरुवात होऊ शकते. अशावेळी तुमच्या फोन स्टोरेज वर लक्ष ठेवावं आणि अनावश्यक फोटोज व व्हिडीओज डिलीट करावे. अत्यावश्यक मीडिया फाइल्सचा इतरत्र बॅकअप घेऊन मोबाइलमधून काढून टाकाव्यात.

लाइट अँड्रॉइड ॲप्सचा वापर

लाइट अँड्रॉइड ॲप्स जुन्या मोबाइल फोन्ससाठी उपयुक्त ठरू शकतात. हे ॲप्स फोनमध्ये कमी स्टोरेज वापरतात तसेच जास्त इंटरनेट देखील वापरत नाहीत. असे ॲप्स वापरल्यावर फोनच्या प्रोसेसर व बॅटरीवर देखील जास्त लोड येत नाही. विशेष म्हणजे लाइट अँड्रॉइड ॲप्स फुल व्हर्जनच्या फास्ट असतात. हे लाइट अँड्रॉइड ॲप्स कमी रॅम व जुन्या प्रोसेसरवर देखील स्मूद तसेच लॅगफ्री चालतात. उदा. जीमेल गो, गुगल गो, यूट्यूब गो आणि मॅप्स गो तसेच फेसबुक लाइट, मॅसेंजर लाइट, इंस्टाग्राम लाइट इत्यादी.

'या' समस्यांना टाळायचं असेल तर साखरेला ठेवा दूर!

आपल्या रोजच्या आहारात कमी अधिक प्रमाणात साखरेचं प्रमाण चांगलंच असतं. काही वेळा प्रत्यक्षरीत्या तर काही वेळा अप्रत्यक्षरीत्या साखर आपल्या शरीरात जात असते. साखर शरीरासाठी आवश्यक घटक आहे. मात्र या साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्याचीही तितकीच गरज आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा घातक ठरू शकतो. त्याप्रमाणेच साखरेचंही आहे. शरीरात साखरेचं प्रमाण अधिक असेल तर अनेक आजारांना सामोरं जावं लागतं. त्यामुळे आहारात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे.



- आहारात साखरेचं प्रमाण जास्त असेल तर त्याचा परिणाम थेट तुमच्या चेहऱ्यावर दिसून येतो. त्यामुळे साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे. शरीरात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर त्वचेचा पोत सुधरतो. त्वचा मुलायम आणि तजेलदार होते. विशेषतः रात्रीच्या वेळी साखरयुक्त पदार्थ कमी खाल्ले तर चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाहीत. तसंच चेहऱ्यावरील मुरुम, डागही क मी होतात.
- साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर शांत झोप लागते.
- साखर जास्त खाल्ल्याने जळजळ आणि श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होतो.
- साखर खाल्ल्यामुळे वजन झपाट्याने वाढतं. त्यामुळे डोनट्स, पेस्ट्री, केक, मिठाई असे पदार्थ शक्यतो खाणं टाळा.
- साखरेचे प्रमाण जास्त असल्यास स्मरणशक्ती कमकुवत होते.
- साखरेमुळे मधुमेह होण्याची शक्यता असते.

ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उपाय...

ओठ काळसर पडण्यामागे अनेक कारणे असू शकतात. असंतुलित आहार, पिग्मेंटेशन, खूप वेळ उन्हामध्ये वावरणे, हलक्या प्रतीची प्रसाधने, विशेषतः हलक्या प्रतीची लिपस्टिक वापरणे, अशा किती तरी कारणांमुळे ओठ काळसर पडू शकतात. पण काही साध्या उपायांचा अवलंब केल्यास ओठांचा रंग पुन्हा पूर्ववत होण्यास सहाय्य मिळते.


मध : रात्री झोपण्यापूर्वी थोड्या मधाने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. हे मध रात्रभर ओठांवर तसेच राहू द्यावे. मधाचा वापर आपल्या आहारामध्येही नियमित करावा. मधात अँटी ऑक्सिडंट्स व मॅग्नेशियम हा क्षार भरपूर प्रमाणात असल्यामुळे ओठांना मृदुता प्राप्त होऊन, त्यांचा काळसरपणा दूर करण्यास मध उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे टोमॅटोही ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उत्तम आहेत. यामध्ये असलेले सेलेनियम सूर्याच्या प्रखर उन्हापासून ओठांचे रक्षण करते. टोमॅटोचा वापर आपल्या आहारामध्ये तर करावाच, शिवाय उन्हामधून फिरून आल्यानंतर त्वरित टोमॅटोची पेस्ट ओठांवर लावावी. असे केल्याने, उन्हामुळे ओठांवर आलेला काळसरपणा दूर होतो.



ग्रीन टी

आपण दिवसभरात अनेकदा चहा किंवा कॉफी घेत असतो. पावसाळ्यात किंवा थंडीच्या मोसमात तर चहा किंवा कॉफी पिण्याचे प्रमाण अजूनच वाढते. पण चहा किंवा कॉफीच्या अतिसेवनाने देखील ओठ काळसर दिसू शकतात. त्यामुळे दिवसातून अनेकदा चहा किंवा कॉफी घेण्यापेक्षा, ग्रीन टीच्या सेवनाचे प्रमाण वाढवा. ग्रीन टीमध्ये असलेले पॉलिफेनॉल्स शरीरातील फ्री रॅडिकल्स कमी करून, उन्हामुळे किंवा चहा - कॉफीच्या अतिसेवनाने काळसर पडलेले ओठ पुन्हा पूर्ववत करण्यास मदत करतात. ग्रीन टी च्या टी-बॅग्स थोड्याशा पाण्याने ओलसर करून घेऊन, त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज केल्यासही ओठांचा काळसरपणा दूर होण्यास मदत मिळते, तसेच ओठ मऊ राहतात.

नारळ : आपल्या आहारात नारळाचा समावेश अवश्य करा. हे आपल्याला निरनिराळ्या प्रकारे करता येईल. नारळाचे पाणी प्या, त्याचे ताजे खोबरे भाज्यांवर किंवा गरमागरम पोहे, उपमा, खिचडीवर घालून खा किंवा कुठल्याही भाजीच्या ग्रेव्हीमध्ये नारळाचे दूध वापरा. नारळाचे तेलही स्वयंपाकामध्ये वापरता येऊ शकेल. नारळाच्या सेवनाने त्वचा नितळ राहते. नारळाचे तेल दररोज ओठांना लावल्यास ओठ गुलाबी व मऊ राहतील.



अक्रोड : अक्रोडमध्ये असलेले ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स त्वचेमधील कोलाजेन वाढवण्यास सहाय्य करतात. त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढल्याने त्वचा लवचिक होते. अक्रोडची जरा जाडसर पेस्ट बनवून त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. असे केल्याने ओठांच्या त्वचेवरील मृत पेशी निघून जाऊन ओठांचा काळसर पडलेला रंग हलका होण्यास मदत होईल. तसेच दह्याच्या वापराने त्वचा नितळ होऊन त्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत मिळते. त्यामुळे आपल्या आहारामध्ये दह्याचा समावेश अवश्य करावा. दह्यामध्ये थोडेसे केशर घालून त्याने ओठांचा मसाज केला असता, ओठांवरील पिग्मेंटेशनमुळे आलेला काळसरपणा दूर होण्यास मदत मिळेल.

लिंबाचा रस : आपल्या शरीरामधील ॲसिड्स व तीव्र अल्कलींमुळे ओठ काळसर पडू शकतात. गरम पाण्यामधून लिंबाचा रस घेतल्याने शरीरामधून ही ॲसिड्स व अल्कली बाहेर टाकण्यास मदत मिळते. लिंबू हे अत्यंत प्रभावी ब्लीच आहे. थोडीशी साखर एका लिंबाच्या लहान फोडीवर घालून त्याने ओठ चोळल्यास ओठांचा काळसरपणा दूर होतो. त्याचप्रमाणे ॲलो व्हेरा किंवा कोरफड, ओठांचा काळसरपणा दूर करण्यास उपयुक्त आहे. ॲलो व्हेराच्या रसाचा समावेश आपल्या आहारात करावा आणि त्याच्या गराने ओठांवर नियमित मसाज करावा. या उपायाने ओठांचा काळसरपणा दूर होऊन ओठ पुनश्च गुलाबी व मृदू होतील.



पी हळद आणि हो बरी

मराठीत एक म्हण आहे. पी हळद अन् हो गोरी. या म्हणीचा अर्थ काही वेगळा आहे. कोणत्याही उपायाचा परिणाम पटकन होत नसतो. हळद प्यायल्यावर लगेच कोणी गोरी होत नसते असे या म्हणीतून सुचवायचे आहे, पण प्रत्यक्षात मात्र हळद ही काही बाबतीत चटकन आणि बराच गुण देणारी आहे. असे काही प्रयोगातही दिसून आले आहे. काही लोकांनी हळद मिसळलेले पाणी दररोज सकाळी प्राशन करून त्याचे फायदे नोंदवले आहेत तर काहींनी हळदीचा चहा किती गुणकारी असतो याचा अनुभव घेतला आहे. दररोज सकाळी साधारण ग्लासभर पाणी घ्यावे. ते गरम करावे आणि कोमट झाल्यावर त्यात अर्धा चमचा हळद मिसळावी. हे पाणी थंड झाल्यावर प्यावे त्याचे अनेक फायदे होतात.

हळद ही जंतुनाशक असते. त्यामुळे ती अनेक रोगांचा सामना करण्यास उपयोगी पडते. काही वेळा ती काही रेडिएशन्सचाही प्रतिकार करण्यास फायदेशीर ठरली आहे. सध्या आपण मोबाईल फोन फार वापरतो आणि त्याच्या रेडिएशन्सचा आपल्यावर काही परिणाम होण्याची शक्यता असते. आपल्याला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात हळद वापरायला मिळाली तर अशा परिणामांपासून आपण दूर राहू शकतो. हळद पाण्यात मिसळून प्यावी किंवा आहारात तिचा समावेश अवश्य होईल याची दक्षता घ्यावी. आपल्या समाजात दूध आणि हळद पिण्याची पद्धत आहे. त्यामुळे बसलेला घसा मोकळा होतो. घशाला कसला संसर्ग झाला असेल तर हळद आणि दूध गुणकारी ठरते. खोकला आल्यावर तर हळद आणि दूध घेतातच. ते घेतल्यावर दुसरे कसलेही औषध घेण्याची गरज नाही असे मानतात.



काही लोक हळदीचा चहा तयार करतात. तो तयार करण्याची पद्धत आहे. कपभर पाण्यात चमचाभर हळद टाकून हे मिश्रण उकळा. नंतर त्याला खाली उतरवून त्यात थोडा मध टाका. त्याशिवाय त्यात थोडे लिंबू पिळा किंवा त्यात संत्र्याचा रस मिसळा. त्यामुळे या मिश्रणाला चांगली चव येईल. असा हा चहा प्याल्याने वजन कमी होण्यास मदत होते. संधिवाताचा त्रास कमी होतो. शिवाय यात काही मिनरल्स रोगप्रतिकारक आणि कर्करोगास प्रतिबंध करणारे आहेत. जगाच्या काही भागात हळदीचा असा चहा फार लोकप्रिय आहे. कारण त्यामुळे मधुमेहाचा उपद्रव कमी होतो. हळद हे अगदी सहजगत्या उपलब्ध होणारे औषध आहे. त्याचा वापरही आपण करीत असतो, पण त्याचे अनेक फायदे आपल्याला माहीतही नसतात.

मुंबईकरांचे पाणी महागणार! ६ ते ७ टक्के पाणीपट्टी वाढीचा प्रस्ताव

तलाव अर्धे भरल्यानंतर अंमलबजावणी

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

गेली पाच वर्षे या ना त्या निमित्ताने टाळण्यात आलेला मुंबईकरांच्या पाणीपट्टीमध्ये वाढ करण्याचा निर्णय आता लागू होण्याची चिन्हे आहेत. याबाबतचा प्रस्ताव मुंबई मनपाने तयार केला असून मुंबईत ६ ते ७ टक्के पाणी पट्टी वाढण्याचे संकेत मिळत आहेत. पेट्रोल-डिझेल-गॅस दरवाढीने सर्वसामान्य होरपळत असतानाच हा प्रस्ताव मंजूर झाल्यास नागरिकांचा दर महिन्याचा पाण्याचा खर्चही वाढणार आहे.

जलवाहिन्यांची देखभाल, शुद्ध पाणीपुरवठयावर जल विभागाच्या वतीने दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो. त्यामुळे पाणी पट्टीत ६ ते ७ टक्क्यांपर्यंत वाढ करण्याबाबत हालचाली सुरू आहेत. याबाबत आयुक्त व अतिरिक्त आयुक्तांबरोबर चर्चा झाली आहे. पाणीपट्टीत वाढ करण्यासाठी प्रशासन आग्रही आहे. पण, सध्याच्या मनपाने पाणी कपात केली आहे. या काळात पाणीपट्टी वाढवल्यास जनतेत रोष निर्माण होईल, या भीतीने भाजपने पाणीपट्टी वाढीला विरोध केला आहे. येत्या पावसाळ्यात धरणे अर्धी भरल्यानंतर पाणी पट्टीत वाढ करण्याचे प्रशासनाने ठरवल्याचे कळते. दरम्यान, गेल्या पाच वर्षात पाणीपट्टीत वाढ करण्यात आलेली नाही.मनपाचा खर्च वाढला असून तो लक्षात घेता ही वाढ करणे गरजेचे असल्याचे मुंबई महापालिका प्रशासनाने सांगितले.

मुंबईला १२० किलोमीटर अंतरावरुन जल वाहिन्याद्वारे पाणीपुरवठा होतो. जल वाहिन्यांची देखभाल, पाण्यावर प्रक्रिया करुन शुद्ध करणे आदींवर वर्षाला कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. त्यामुळे मुंबई मनपाने आर्थिक गणित जुळवण्यासाठी यंदा वाढ करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे.

मध्यंतरी याबाबतचा पाणीपट्टी वाढीचा प्रस्ताव सभागृहात सादर करण्यात आला असता महापौर रितू तावडे यांनी त्याला स्थगिती दिली होती. विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी या वाढीविरोधात आवाज उठवल्यावर वाढ होणार नाही असे स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी सभागृहात म्हटले होते. त्यामुळे पाणीपट्टीतील वाढ टळली होती.

आजवर टाळलेला निर्णय

मुंबईत कोरोनाचा आल्यानंतर मनपाचे आर्थिक गणित बिघडले. २०२० मध्ये पाणीपट्टीत वाढ न करण्याचा निर्णय घेण्यात आला. तर २०२१ ते २५ या दरम्यान, कोणत्याही क्षणी निवडणुका लागण्याची शक्यता असल्याने हा निर्णय टाळण्यात आला होता. मात्र आता पालिकेची आर्थिक कोंडी वाढली असून खचार्चा ताळमेळ राखण्यासाठी ही वाढ अपरिहार्य बनली आहे.



...अन्यथा १२५ कोटींवर पाणी सोडावे लागणार

गेल्या पाच वर्षांत पाणी पट्टीत वाढ न केल्याने आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले. यंदाही पाणी पट्टीत वाढ न केल्यास पालिका प्रशासनाला १०० ते १२५ कोटी रुपयांवर पाणी सोडावे लागणार आहे.

उन्हाच्या चटक्याने जिल्हा होरपळला

पाणीटंचाईने ग्रामीण भागात भीषण परिस्थिती



■ ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे जिल्ह्यात उन्हाचा चटका दिवसेंदिवस वाढत असून शहर व ग्रामीण भागात उष्णतेच्या लाटेने नागरिक अक्षरशः होरपळून निघत आहेत. तापमानाने कमाल पातळी गाठली असताना ग्रामीण भागात झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे घामाच्या धारांनी त्रस्त झालेल्या नागरिकांना तात्पुरता गारवा अनुभवायला मिळाला. पर्जन्यराजाचे आगमन अद्याप दूर असले तरी अवकाळी सरींनी त्याची चाहूल दिल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

या उन्हाळ्यात आतापर्यंतचे तापमानाचे सर्व विक्रम मोडले असून पुढील काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. एकीकडे उष्णतेची तीव्रता वाढत असताना ग्रामीण भागात पाणीटंचाईने गंभीर स्वरूप धारण केले आहे. विशेषतः मुरबाड आणि शहापूर तालुके सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. विहिरी, बोअरवेल आणि स्थानिक जलस्त्रोत कोरडे पडू लागले आहेत. काही ठिकाणी विहिरींमध्ये साचलेले गढूळ पाणी प्यायल्यामुळे कावीळ, अतिसार यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे.

ग्रामीण भागात पाणी अडवा, पाणी जिरवा या धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याची आवश्यकता असून त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. त्यामुळे दरवर्षी पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होत आहे.

टँकरवर अवलंबून पाणीपुरवठा

जिल्हा प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात आला असला तरी डोंगराळ भागातील नागरिकांना पाण्यासाठी अनेक किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. सुमारे २७ गावे आणि १०३ पाड्यांमध्ये राहणाऱ्या ४२ हजार २७३ कुटुंबांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना रोजच्या जगण्याचा संघर्ष करावा लागत असून पिण्याचे पाणी डोळ्यातील अश्रूंहूनही महाग झाले आहे, अशी स्थिती निर्माण झाली आहे. मुक्या जनावरांसाठीही पाणी व चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

धरणातील पाणीसाठ्यावर परिणाम

बारवी धरण आणि टाटा समूहच्या आंध्रा धरणातील पाण्याचे उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत असून पाणीसाठा कमी होत आहे. याचा परिणाम जिल्ह्यातील महापालिका व नगरपालिकांवर होणार आहे. लघुपाटबंधारे विभागाने १४ मेनंतर मोठ्या प्रमाणात पाणी कपातीचे संकेत दिले असून मे अखेरपर्यंत तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तवली आहे.

शहरांवरही परिणामाची शक्यता

ठाणे शहरातील घोडबंदर परिसर, कळवा, मुंब्रा तसेच कल्याण-डोंबिवली परिसरातील २७ गावे, भिवंडी, मीरा-भाईंदर आणि बदलापूर-अंबरनाथ भागातही पाणी कपातीचा फटका बसण्याची शक्यता आहे.

मुंबईत सायबर गुन्ह्यातील १०० कोटी वाचविण्यात यश

■मुंबई। प्रतिनिधी,

गेल्या काही वर्षांत सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून सायबर पोलिसांनी सुरू केलेल्या मदत क्रमांकामुळे यावर्षी नागरिकांची शंभर कोटी रुपयांहून अधिक रक्कम भामट्यांच्या खात्यात वर्ग होण्यापासून रोखण्यात यश आले आहे. तर गेल्या चार वर्षांत फसवणुकीचे ४९१ कोटी रुपये गोठवून पोलिसांनी नागरिकांना दिलासा दिला. गेल्या काही वर्षांमध्ये सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सायबर गुन्हेगार विविध मागार्ने सर्वसामान्य नागरिकांच्या बँक खात्यावर डल्ला मारून लाखो रुपये ऑनलाईन पद्धतीने काढून घेत आहेत. याच फसवणुकीला आळा घालण्यासाठी २०२२ पासून मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेने मदत क्रमांक १९३० सुरू केला. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नागरिक या मदत क्रमांकावर संपर्क साधत असून मदत क्रमांकावर नागरिकांची तक्रार येताच पोलीस तत्काळ कारवाईला सुरुवात करीत आहेत. परिणामी, यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. सायबर पोलिसांच्या या मदत क्रमांकावर जानेवारी २०२६ ते १९ मे २०२६ या कालावधीत फसवणूक झालेल्या २ लाख ५५ हजार ९२ नागरिकांनी तक्रारी केल्या. यापैकी ३० हजार ३०२ जणांच्या बँक खात्यामधील रक्कम इतर खात्यात जाण्यापूर्वीच पोलिसांनी रोखली. ही रक्कम १०१ कोटी ३९ लाख ६ हजार ५५६ रुपये इतकी आहे. तर मे २०२२ ते मे २०२६ या चार वर्षांमध्ये आरोपींच्या बँक खात्यातील एकूण ४९१ कोटी ५७ लाख ८० हजार ७७९ रुपये इतकी रक्कम गोठवण्यात सायबर पोलिसांना यश आले. पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त इरफान शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुवर्णा शिंदे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय अलगुर, पोलीस उपनिरीक्षक पूनम जाधव आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली. नागरिकांनी फसवणूक झाल्यानंतर घाबरून न जाता तत्काळ मदत क्रमांक १९३० वर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.



भरायला गेले 13 रुपए, खात्यातून गेले 20 लाख

गॅस वाहिनीचे 13 रुपये थकीत बिल भरण्याच्या नावाखाली मिरा रोड येथील 65 वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची तब्बल 20 लाख रुपयांची सायबर फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिरा रोड येथे राहणाऱ्या एका ज्येष्ठ नागरिकाला अनोळखी क्रमांकावरून संदेश आला होता. त्यात तुमचे 13 रुपये गॅस बिल थकीत आहे. त्वरित भरा, अन्यथा गॅस कनेक्शन बंद करण्यात येईल,असे नमूद करण्यात आले होते.त्यामुळे तक्रारदाराने सुरुवातीला क्रेडिट कार्डद्वारे पैसे भरण्याचा प्रयत्न केला. मात्र तो अयशस्वी झाल्यानंतर त्यांनी संबंधित क्रमांकावर संपर्क साधला. समोरील व्यक्तीने स्वतःला गॅस कंपनीचा कर्मचारी असल्याचे सांगत नेट बँकिंगद्वारे 13 रुपये भरण्यास सांगितले. तक्रारदाराने ऑनलाइन पैसे भरल्यानंतर काही वेळातच त्यांच्या बँक खात्यातून 19 लाख 81 हजार रुपये परस्पर ट्रान्सफर करण्यात आले. तसेच क्रेडिट कार्डवरून 49 हजार रुपयांची ऑनलाइन खरेदीही करण्यात आली. अवघ्या चार तासांत सायबर भामट्यांनी एकूण 20 लाख 31 हजार रुपयांचा गंडा घातला.

जळगाव जिल्ह्यातील धरणात केवळ ४०% साठा

जुलै अखेरपर्यंत पाणी पुरवण्याचे प्रशासनासमोर आव्हान

■जळगाव। प्रतिनिधी,

जळगाव जिल्ह्यात ४६ अंशापर्यंत तापमान गेले असून यामुळे जिल्हा होरपळून निघत असून त्याचा परिणाम जिल्ह्यातील पाणीसाठ्यावर झालेला आहे. जिल्ह्यातील धरणात ४० टके पाणीसाठा असून १३ मध्यम प्रकल्पात ४५ टक्के पाणीसाठा आहे. यामुळे सध्याचे तापमान पाहता असलेले पाणी हे जुलै अखेरपर्यंत पुरवणे हे जिल्हा प्रशासनासमोर आव्हान आहे.

जळगाव जिल्ह्यात दरवर्षी ४५ अंशापर्यंत तापमान जाते. यंदा मात्र तापमानाने ही मर्यादा ओलांडली असून ४६ अंश तापमान नोंदवले गेले. या वाढत्या तापमानाने सारेच होरपळले जात असून धरणातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत आहे. यंदा पावसाळ्यात जिल्ह्यातील हतनूर, गिरणा व वाघूर हे तीनही प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले होते. २३ एप्रिलला या तीनही प्रकल्पांचा साठा हा ५२ टक्के होता. आज हा साठा ४० टक्क्यांवर आला आहे. यात हतनूर २९ टक्के, गिरणा ३१ टक्के तर वाघूर ६९ टक्के पाणीसाठा आहे. हतनूर धरणात आज ५४ टक्के गाळ साठलेला असल्याने या धरणातील पाणीसाठा हा फसवा असल्याचे सांगितले जाते.



भुसावळ शहर, रेल्वे, वरणगाव आणि भुसावळ ऑर्डनन्स फॅक्टरी, जळगाव एमआयडीसी यांना या धरणातून पाणीपुरवठा होत आहे. सध्याचा साठा पाहता जुलै अखेर पाणी पुरवणे हे आव्हान ठरणार असले तरी पाणी काटकसरीने वापरावे लागेल, असे पाटबंधारे विभागाचे म्हणणे आहे. उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे धरण असलेल्या गिरणा धरणात आज ३१ टक्के पाणीसाठा आहे. एक महापालिका दहा नगरपालिका, १७४ गावे, १३० पाणीपुरवठा योजना व सात तालुक्यांना या धरणातून पाणी पुरवठा होतो.

बाष्पीभवनाने पाणीसाठा हा कमी होत असून जुलै अखेर पाणी पुरवणे हे आव्हान आहे. वाघूर धरणातून जळगाव शहराला पाणीपुरवठा होत असून याज या धरणात ६९ टक्के पाणी असल्याने जळगावकरांना पाण्याची चिंता आहे. जिल्ह्यात १४ मध्यम प्रकल्प असून बहुतेक प्रकल्प यंदा पावसाळ्यात पूर्ण क्षमतेने भरले होते.

अखेर जिल्ह्यात ११ टँकर सुरू

आतापर्यंत जिल्ह्यात यंदा एकही टँकर सुरू नव्हता. जिल्ह्यात सात गावांना अकरा अँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. ४२ गावांत ४३ विहिरी या अधिग्रहीत करण्यात आलेल्या आहेत. अमळनेर, जामनेर आणि भुसावळ तालुक्यात ही पाणीटंचाईची स्थिती उदभवली आहे. पाणीसाठा वाढण्यासाठी धरणातील गाळ काढण्याचे सरकारने जाहीर केले. तरीही धरणातील गाळ कोण काढणार, कसा काढणार कधी काढणार याबाबत कोणतेही मार्गदर्शन आलेले नसल्याने प्रशासनात संभ्रमाचे वातावरण आहे.

'तू शाळेच्या गच्चीवर ये...'

प्रेमीयुगुलाची शेवटची भेट, पुढे काय घडलं?

■मुंबई। प्रतिनिधी,

एका तरुणीच्या हत्याकांड प्रकरणाचा पोलिसांनी अवघ्या 12 तासांच्या आत छडा लावून मोठे यश संपादन केले आहे. ज्या युवकावर ती तरुणी सर्वात जास्त विश्वास ठेवत होती, तोच तिचा मारेकरी निघाला. पोलिसांनी हत्येतील आरोपी प्रियकराला अटक केली आहे. आरोपीच्या माहितीवरून हत्येसाठी वापरलेला चाकू आणि रक्ताने माखलेले कपडेही जप्त करण्यात आले आहेत. बिहारच्या सुपौल जिल्ह्यातील हे प्रकरण आहे.

पोलिसांनी आरोपीच्या माहितीवरून त्याच्या घरातून हत्येसाठी वापरलेला चाकू आणि घटनेच्या वेळी परिधान केलेला रक्ताने माखलेला टी-शर्ट जप्त केला आहे. पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, जप्त करण्यात आलेले साहित्य या प्रकरणात महत्त्वाचा पुरावा म्हणून काम करेल. पोलिसांच्या वेगवान कारवाईमुळेच या संपूर्ण प्रकरणाचा छडा कमी वेळेत लावणे शक्य झाले. एसपी सरथ आर.



एस. यांनी सांगितले की, आरोपी नितीश कुमार आणि मृत वंदना कुमारी यांच्यात बऱ्याच काळापासून प्रेमसंबंध होते. दोघांमध्ये लग्नावरून वाद सुरू होता. तरुणी आरोपीवर लग्न करण्यासाठी दबाव टाकत होती, मात्र आरोपीला लग्न करायचे नव्हते. याच वादामुळे संतापून आरोपीने हत्येचा कट रचला. त्याने तरुणीला भेटण्याच्या बहाण्याने सरकारी शाळेत बोलावले आणि धारदार चाकूने गळा चिरून तिची निर्मम हत्या केली.

पोलिसांच्या त्वरित कारवाईमुळे अवघ्या 12 तासांच्या आत या खळबळजनक हत्याकांडाचा खुलासा करण्यात आला. आरोपीला अटक करण्यात आली असून त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे. सुपौल पोलिसांचे म्हणणे आहे की, या प्रकरणात पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. या त्वरित कारवाईला पोलिसांचे मोठे यश मानले जात आहे.



शाळेच्या गच्चीवर आढळला मृतदेह

राजेश्वरी ठाणे हद्दीतील चरनै गावातील सरकारी शाळेच्या गच्चीवर वंदना कुमारी नावाच्या तरुणीचा गळा चिरून हत्या केलेला मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली होती. तरुणीच्या निर्घृण हत्येची माहिती मिळताच पोलीस त्वरित तपासचक्रे हलवली. एसपींच्या सूचनेवरून त्रिवेणीगंजचे एसडीपीओ विभाष कुमार यांच्या नेतृत्वाखाली एका विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली. पोलीस पथकाने तांत्रिक संशोधन, वैज्ञानिक तपास आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे वेगाने कारवाई सुरू केली. तपासादरम्यान पोलिसांनी हत्येतील आरोपी प्रियकर नितीश कुमार याला अटक केली. चौकशीदरम्यान आरोपीने आपला गुन्हा कबूल केला.

शेअर मार्केटमध्ये 'डबल रिटर्न'चं आमिष

अलिबागमधील व्यक्तीची तब्बल ६६ लाखांची ऑनलाइन फसवणूक

■रायगड। प्रतिनिधी,

रायगड जिल्ह्यातील अलिबागमध्ये सायबर फसवणुकीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शेअर बाजारात गुंतवणुकीवर मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत सायबर भामट्यांनी एका व्यक्तीची तब्बल ६६ लाख ५४ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक केली आहे. या घटनेमुळे गुंतवणुकीच्या नावाखाली सुरू असलेल्या सायबर टोळ्यांचा धोका पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फियार्दी हे अलिबाग तालुक्यातील शिवनगर, चेंढरे परिसरातील रहिवासी आहेत. १३ फेब्रुवारी २०२६ ते ११ मे २०२६ या कालावधीत अज्ञात आरोपींनी फेसबुकच्या माध्यमातून त्यांच्याशी संपर्क साधला. सुरुवातीला आरोपींनी शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास कमी वेळात मोठा नफा मिळतो, असे सांगत विविध लिंक आणि बनावट ट्रेडिंग प्लॅटफॉर्मची माहिती दिली.



यानंतर आरोपींनी बनावट ग्राफ, खोटे नफ्याचे स्क्रीनशॉट आणि डेमो दाखवत फियार्दीचा विश्वास जिंकला. सुरुवातीला कमी रकमेची गुंतवणूक करून मोठा परतावा मिळाल्याचे दाखवण्यात आले. त्यामुळे फियार्दीला अधिक गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करण्यात आले.

सायबर भामट्यांनी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे ट्रान्सफर करण्यास सांगितले. ''शेअर्स खरेदी'', ''प्रीमियम मेंबरशिप'', ''विशेष ट्रेडिंग योजना'' आणि ''मोठ्या नफ्यासाठी अतिरिक्त गुंतवणूक'' अशा विविध कारणांखाली आरोपींनी टप्प्याटप्प्याने तब्बल ६६ लाख ५४ हजार ३६३ रुपये उकळले. काही दिवसांनी गुंतवलेली रक्कम आणि नफा काढण्याचा प्रयत्न केल्यानंतर फियार्दीला संशय आला. आरोपींकडून सतत नवीन पैसे भरण्याची मागणी होत असल्याने अखेर आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तातडीने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

या प्रकरणी सायबर पोलिसांनी गुन्हा रजिस्टर क्रमांक ०२/२०२६ अन्वये माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील कलम ६६(डी) तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१६(२) आणि ३१८(४) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल जाधव करत आहेत.

दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियावरून येणाऱ्या गुंतवणुकीच्या ऑफर्सपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, अनधिकृत ट्रेडिंग ॲप्सवर विश्वास ठेवू नये आणि जास्त परताव्याचे आमिष दाखवणाऱ्या योजनांपासून दूर राहावे, असे आवाहन सायबर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

नेमकं काय घडलं?

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी संरक्षण दलातील अधिकाऱ्याची कन्या आहे. ही मुलगी आरोपीच्या नातीसोबत खेळण्यासाठी वारंवार त्यांच्या घरी जात असे. आरोपी आपल्या विवाहित मुलीसोबत आणि नातीसोबत राहत होता. आरोपीची नात त्याला 'आजोबा' म्हणत असे, त्यामुळे पीडित मुलगीही त्याला याच नावाने हाक मारत असे. 3 मे रोजी ही चिमुरडी नेहमीप्रमाणे खेळण्यासाठी वकिलाच्या घरी गेली होती. खेळत असताना आरोपीने तिला एका बहाण्याने दुसऱ्या खोलीत बोलावले आणि तिथे तिच्यासोबत लज्जास्पद कृत्य केले.

अशी आई कुणालाही न मिळो!

आपल्याच 8 महिन्यांच्या चिमुकलीला ॲसिड पाजले



मुलीला ॲसिड पाजण्यामागे कारण काय?

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित बालिकेचे वडील मोहित हे रोजच्याप्रमाणे आपल्या कामावर गेले होते. घटनेच्या वेळी घरात त्यांची पत्नी आणि आठ महिन्यांची मुलगी हे दोघेच उपस्थित होते. याच दरम्यान या महिलेने अज्ञात कारणावरून आपल्या पोटच्या मुलीला ॲसिड पाजले. मात्र, या आईने एवढे टोकाचे आणि क्रूर पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस सध्या सर्व बाजूंनी या घटनेचा कसून तपास करत आहेत.

■मुंबई। प्रतिनिधी,

राजस्थानच्या भिवडी भागातून मानवतेला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. शहरातील कॅप्टन चौक परिसरात एका निर्दयी आईने आपल्याच आठ महिन्यांच्या चिमुरडीला ॲसिड पाजल्याचा खळबळजनक आरोप झाला आहे. या अमानुष घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या जीवघेण्या प्रकारानंतर निष्पाप बालिकेची प्रकृती अत्यंत गंभीर झाली असून, तिला तातडीने अलवर येथील बाल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या डॉक्टरांचे एक विशेष पथक तिच्यावर उपचार करत आहे.

तोंडातून अन् नाकातूव रक्त

घटनेच्या काही वेळानंतर चिमुरडीची प्रकृती अचानक बिघडली आणि तिच्या तोंडातून व नाकातून रक्त येऊ लागले. ती वेदनेने प्रचंड तडफडू लागल्याचे पाहून कुटुंबातील इतर सदस्य हादरून गेले. त्यांनी तातडीने तिला भिवडी येथील एका खाजगी रुग्णालयात नेले. परंतु, तिची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगत डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून तिला पुढील उपचारासाठी अलवरच्या बाल रुग्णालयात पाठवले.

ॲसिड पोटात गेल्यामुळे बालिकेच्या अंतर्गत अवयवांना गंभीर इजा झाली असून, सध्या तिला व्हेंटिलेटरवर ठेवून डॉक्टर राशी कौशिक यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.

वडिलांना अश्रू अनावर

या हृदयद्रावक घटनेमुळे पीडित वडील मोहित पूर्णपणे कोलमडून गेले आहेत. आपल्याला एकच मुलगी असून पत्नीनेच तिच्यासोबत असे कृत्य केल्याचे सांगताना त्यांना अश्रू अनावर झाले. दरम्यान, भिवडीच्या अतिरिक्त पोलीस अधीक्षकांनी सांगितले की, या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ पावले उचलली आहेत. मुलीवर उपचार सुरू असून, महिलेने आपल्याच पोटच्या गोळ्यावर असा जीवघेणा हल्ला का केला, या मागच्या मुख्य कारणाचा शोध पोलीस घेत आहेत.

'आई मला खूप दुखतंय...' चिमुरडीसोबत 75 वर्षीय वकीलाने काय केले?

■पुणे। प्रतिनिधी,

मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमधील एका उच्चभ्रू वस्तीतून माणुसकीला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. हबीबगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका 75 वर्षीय वकिलाने आपल्या शेजारी राहणाऱ्या अवघ्या पाच वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक करून त्याची रवानगी तुरुंगात केली आहे.



'आजोबा'ला अटक

थोड्या वेळाने मुलगी घरी परतली आणि तिने आपल्या आईकडे खासगी भागात वेदना होत असल्याची तक्रार केली. पालकांनी तपासणी केली असता तिच्या शरीरावर ओरखड्यांच्या खुणा आढळून आल्या. तातडीने तिला डॉक्टरांकडे नेण्यात आले, जिथे वैद्यकीय तपासणीत तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. घटनेचे गांभीर्य ओळखून कुटुंबीयांनी हबीबगंज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी मुलीचे समुपदेशन केले असता, तिने शेजारच्या आजोबांनी हे कृत्य केल्याचे सांगितले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत 75 वर्षीय आरोपी वकिलाला अटक केली. न्यायालयाने त्याची रवानगी कारागृहात केली आहे.

पालकांमध्ये भीतीचे वातावरण

या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अत्यंत सुरक्षित आणि उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या वस्तीत अशा प्रकारची घटना घडल्याने मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी या प्रकरणात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले असून, अशा गुन्ह्यांना थारा दिला जाणार नाही असे स्पष्ट केले आहे. ही घटना समाजासाठी एक गंभीर इशारा असून, सुरक्षित वातावरणातही मुलांच्या बाबतीत सतर्क राहणे किती गरजेचे आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com